१९१७

म. ग्रं. सं. ठाणें

विषय चरित्र

सं. क्र. ३७८

REFBK-0001410

परचुरे, पुराणिक आणि मंडळी,
बुकसेलर्स, माधवबाग, मुंबई नं. ४

# राजगुरु दादोजी कोंडदेव
आणि
# छत्रपति शिवाजी महाराज.

हें पुस्तक,

जुन्या बखरी आणि दंतकथा ह्यांच्या आधारानें

**नागेशराव विनायक बापट वांईकर,**

"श्रीमंत पहिले बाजीराव साहेब पेशवे" ह्यांच्या चरित्राचे कर्ते,
माजी डेप्युटी ए० इन्स्पेक्टर, जि० धारवाड व श्रीमंत
महाराज गायकवाड सरकार ह्यांच्या अबकारी
खात्याचे दरोगे इ० इ०,

**ह्यांनीं रचिलें.**

---

आवृत्ति सहावी.

---

"निर्णयसागर" [illegible] म जावजी

REFBK-0001410

[illegible]

---

सन १९१७.

# प्रस्तावना.

'श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे यांचें चरित्र' ही माझी मराठी भाषेची पहिली सेवा होय. त्या ग्रंथाबद्दल मला दक्षिणाप्राईज् कमिटीनें बक्षीस दिलें. पुढें तो छापून प्रसिद्ध करणाराची लागलींच मदत मिळाली, छापिलेल्या प्रती लवकर खपल्या, व त्याची दुसरी आवृत्तीही लवकरच निघेल असा रंग दिसत आहे. दक्षिणाप्राईज् कमिटीचे अभिप्राय त्या ग्रंथाला जोडलेच होते. पुढें वर्तमानपत्रकारांचे अभिप्रायही त्यांनाच बहुतांशीं अनुसरून पडले व कित्येक विद्वान् विद्वान् गृहस्थांकडून मला उमेद येण्यासारखी खासगी पत्रें आलीं. एका पोक्त, थोर, अनुभवशीर लोकमान्य व सरकारांत अति उच्च अधिकारास चढलेल्या नामांकित विद्वान् गृहस्थांनीं मला लिहिलें कीं:—

'This is certainly an excellent book and will make your name immortal in the literary world of the Deccan.'

"हें पुस्तक खरोखर फारच सर्वोत्कृष्ट आहे. याच्या योगानें दक्षिणेंतील सर्व विद्वन्मंडलांत तुमचें नांव अजरामर होऊन राहील." सारांश याप्रमाणें या ग्रंथाला राजाश्रय आणि लोकाश्रय चांगला मिळाला. हें एकंदर महाराष्ट्रभाषेला व देशाला भूषण आहे.

याप्रमाणें सदरहू ग्रंथाला उत्तेजन मिळाल्यामुळें पुनः उमेद येऊन हें प्रस्तुतचें पुस्तक मीं रचिलें. ही मराठी भाषेची माझी दुसरी अल्प सेवा आहे. 'स्वमहिमदर्शनमक्ष्णोर्मुकुरतले जायते यस्मात्' असा विचार करून कित्येक सुशिक्षित गृहस्थांसही हें दाखविलें, व त्यांस तें पसंत पडलें. वे. शा. सं. रा. रा. रावजीशास्त्री गोडबोले, रावबहादुर केरो लक्ष्मण छत्रे, रावबहादुर विनायक जनार्दन कीर्तने वगैरे मंडळीच्या आदरास पात्र झाल्यावरून हल्लीं हें प्रिय वाचकांस सादर केलें आहे. याही पुस्तकाला राजाश्रय चांगला मिळाला. या पुस्तकाबद्दल श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड सरकार यांजकडून मला बक्षीस मिळालें. हें ग्रंथोत्तेजनाचें काम, महाराज ता० २८ डिसेंबर इ० १८८१ रोजीं अधिकारारूढ झाले त्याच्या पूर्वींच कांहीं दिवस केवळ त्यांच्या स्वतःच्या मनोत्साहानेंच झालें आहे. ही गोष्ट खुद्द महाराजांस भूषणप्रद तर खरीच; पण लोकदृष्टीनें यांत विशेष अभिनंदनीय भाग हा आहे कीं, 'जयासीं भाग्य येणार बहुत। त्याचीं चिन्हें आधींच दिसत॥ सूर्याआधीं उगवत। अरुण जैसा त्वरेनें॥' या श्रीधर कवीच्या उक्तीप्रमाणें महाराजांनीं संपादन केलेल्या ज्ञानाचें फळ आधींपासूनच दिसूं लागलें. असो. या पुस्तकालाही छापणाराची मदत त्वरित मिळाली. आतां ह्यालाही लोकाश्रय भरपूर मिळाल्यास आणखी दुसरा एक उपयुक्त ग्रंथ तयार होत आला आहे, तोही प्रसिद्ध करण्यास मला उमेद येईल.

या पुस्तकांतल्या दोन्ही व्यक्ती चांगल्या इतिहासप्रसिद्ध आहेत. स्वयंप्रकाश सूर्याला जशी मशालीची गरज नाहीं, तसेंच यांच्याविषयीं येथें विशेष उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं. पुस्तक वाचून पाहिल्यावर यांत काय आहे तें कळतच आहे. यांतील विषय, इतिहास, बखरी, वृद्धपरंपरेनें चालत आलेल्या गोष्टी व कित्येक इंग्रजी आणि मराठी ग्रंथ यांच्या आधारानें लिहिला आहे. एवढें मात्र कळविणें भाग आहे कीं, 'दादांचा उपदेश' हा अस्सल उपदेश नव्हे, व तसा आपल्या देशांत मिळण्याचा संभवही नाहीं. शिवाजी महाराजांच्या अंगीं स्वदेशोद्धाराचा अंकुर आहे असें पाहून दादांनीं आपल्या अंतकाळीं त्यांस पुढें उपयोगीं पडण्यासारखा उपदेश केला, अशी इतिहासप्रसिद्ध गोष्ट आहे. तोच प्रसंग पायाला घेऊन त्याजवर राजेरजवाडे व इतर सर्व लोक यांस उपयोगीं पडण्याजोगा हा उपदेश रचिला आहे.

या पुस्तकांतील विषय एतद्देशीय स्वदेशभक्तांस मात्र प्रिय होईल. कित्येक परदेशीय दुराग्रही लोक 'नावडतीचें मीठ अळणी' या न्यायानें त्याचा तिरस्कार करतील हें उघड आहे. यासाठीं अशा पुस्तकाला आमच्या इकडच्या लोकांनींच पाठवळ देण्याचें मनावर घेतलें पाहिजे. पुस्तकांत भाषासौरस्याची उणीव आढळल्यास त्याचा बोल भाषेकडे कांहींएक नाहीं. तो दोष वाचकांनीं माझ्याच माथीं मारावा हें योग्य आहे. अभिज्ञानशाकुंतल नाटकांत ६ व्या अंकांत दुष्यंत राजा शकुंतलेची तसबीर हातांत घेऊन पाहूं लागला, तेव्हां त्यानें ह्मटलें आहे कीं, 'या तसबिरींत जें जें ह्मणून कमी वाटतें तें तें मला काढतां आलें नाहीं, म्हणून तें तसें दिसतें; तथापि या तसबिरींत तिच्या लावण्याची उगीच थोडीशी लकेर दिसत आहे.' होय, मराठी भाषेच्या संबंधानेंही माझें असेंच ह्मणणें आहे. मागील पुस्तकाच्या प्रस्तावनेंत मीं कळविलेंच आहे कीं, अडाणी सोनाराच्या हातून दागिन्याचा थाट सुरेख न बनला तर ती कसूर सोन्याची कीं सोनाराची?' तर पुस्तककाराच्या गैरवाकबपणाबद्दल भाषेला मात्र नांवें ठेवूं नका. ती जन्माचीच कपाळकरंटी व दरिद्री आहे असें ह्मणूं नका. १२ व्या शतकांत तिची व तिची प्रिय मातुश्री गीर्वाणभाषा यांची ताडातोड झाली, तेव्हांपासूनच तिचा बारीक नजरेनें इतिहास पाहिला तर शकुंतलेप्रमाणेंच आमच्या प्रिय मराठी भाषेचींही स्थित्यंतरें बऱ्याकडे होत आहेत, असें उत्कर्ष इच्छिणारांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. दुष्यंत राजाला शकुंतलेचा जसा शेवटीं अंगीकार करावा लागला, व पुढें ती जशी मोठ्या वैभवास चढली, त्याप्रमाणें ही आमची मराठी भाषाही कांहीं कालानें राज्यकर्त्यांच्या आश्रयास पात्र होऊन चांगल्या वैभवास चढणार आहे असें खचित भाकीत दिसतें, तें ईश्वरकृपेनें खरें ठरो.

**पुस्तककर्ता.**

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

प्रथमावृत्तींत थोडासा फेरफार करून थोड्याच दिवसांत या पुस्तकाची दुसरी आवृत्ती काढण्याचा ईशकृपेनें हा प्रसंग आला आहे. प्रथमावृत्तीच्या दोन हजार प्रती एक वर्षाच्या आंतच सहज खपल्या, व अजूनही पुस्तकाबद्दल मागण्यांवर मागण्या येतच आहेत. ही आमच्या प्रिय मराठी भाषेला व देशाला मोठी भूषणाची गोष्ट आहे. पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत मीं ह्मटलें होतें कीं, "अशा पुस्तकाला आमच्या इकडच्या लोकांनींच पाठबळ देण्याचें मनावर घेतलें पाहिजे." खरोखर अनुभवही तसाच आला आहे. या आवृत्तीच्या शेवटीं एक नाममालिका जोडिली आहे. तींत ज्यांनीं २० पासून १५० प्रतींपर्यंत एकदम आश्रय दिला त्यांचींच नांवें दाखल केलीं आहेत. त्यांजवरून असें दिसून येईल कीं, चांगल्या संपन्न व सुशिक्षित गृहस्थांकडूनच याला भरपूर पाठबळ मिळालें आहे.

प्रथमावृत्ति प्रकट होतांच वर्तमानपत्रकारांचे उमेद येण्यासारखेच अभिप्राय बाहेर पडले. शिवाय मला पुष्कळांकडून खासगी रीतीनें पत्रांवर पत्रें आलीं व येत आहेत. त्या लिहिणारांमध्यें नव्या चालीचे, जुन्या चालीचे, सुशिक्षित, अशिक्षित, पदवी धारण केलेले, पदवी न धारण केलेले, ओळखीचे, अनोळखीचे, ग्रंथकर्ते, असे सर्व प्रकारचे लोक आहेत. त्या सर्वांचा अभिप्राय सर्वांशीं एकमेकांशीं मिळता ह्मणजे ग्रंथकर्त्याला उत्तेजन येण्यासारखाच आहे. तीं सर्व पत्रें येथें दाखल करण्याचें हें योग्य स्थळ नव्हे व प्रयोजनही नाहीं; सबब मासल्याकरितां येथें कांहीं उतारे देतों.

Rao Bahadur Anandrao Sakharam Barve, B. A. a well-known Marathi Scholar, says in his letter dated 27th May 1882.

"I have carefully and with great interest read your Dadoji Kondev's Deathbed Advice to the great Shivaji. In my humble opinion your production does, every way, prove to be a fit successor to the Life of Bajirao. I think as a Marathi composition it is undoubtedly possess-

ed of high merit. Your Bajirao, I daresay, has earned for you a high rank amongst Marathi writers and you surely make your title thereto strong by the present book."

( १ ) मराठी भाषेचे मर्मज्ञ रावबहादूर आनंदराव सखाराम बर्वे बी. ए. बडोद्याहून ता० २७ मे १८८२ चे पत्रांत कळवितात कीं, "आपण तयार केलेला, थोरले शिवाजी महाराज यांना—दादोजी कोंडदेवाचा अंतकाळचा उपदेश मीं मोठ्या हौसेनें लक्षपूर्वक वाचून पाहिला. हा ग्रंथही पूर्वीं छापून प्रसिद्ध झालेल्या आपल्या बाजीरावाच्या चरित्राच्याच तोडीचा तंतोतंत आहे, असा माझा अभिप्राय आहे. माझ्या दृष्टीनें मराठी ग्रंथांमध्यें या ग्रंथाची योग्यता निःसंशय फारच मोठी आहे. आपल्या बाजीरावानें आपल्यास मराठी ग्रंथककर्त्यांमध्यें पहिल्या प्रतीचा मान मिळवून दिला आहे. आणि हल्लींच्या पुस्तकानें तर खचीत तो बहुमान आपण सदृढ करून टाकला असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं."

परशुरामभाऊ पटवर्धन यांचे चरित्रकार ता० १७ आगष्ट १८८२ चे पत्रांत ह्मणतात—

( २ ) "आपल्या पुस्तकांनीं आपली जिकडे तिकडे इतकी ख्याति आहे कीं, मराठी भाषेचें अध्वर्युत्व आपणाकडे सांप्रत आहे असा सर्वत्र लौकिक आहे. मिथ्या स्तुतीचा दोप मजकडे ठेवाल तर निरुपाय आहे; परंतु खरा प्रकार आहे तो लिहित आहें."

'मल्हारराव महाराज गायकवाड यांचा इतिहास' याचे कर्ते ता० ५ आक्टोबर १८८२ चे पत्रांत असें ह्मणतात—

( ३ ) " आपण उत्तम ग्रंथकारांमध्यें प्रथमांगुलिनिविष्ट आहांत असें मी मानतों. आपले दोन्ही ग्रंथ मीं अक्षरशः वाचिले आहेत."

Remark of the Government Registrar of Native publications. (See Government Gazette Dated 1st June 1882).

"The book is written in plain and attractive language."

सरकारचे नेटिव पब्लिकेशनचे रजिस्ट्रार ह्मणतात. (ता० १ जून १८८२ चें गव्हरमेंट ग्याझिट पाहा. )

( ४ ) "हें पुस्तक साध्या आणि मनोहर भाषेनें लिहिलें आहे."

पूर्वींच्या चालीचे वडोदें राज्यांतले एक जहागीरदार गृहस्थ मिति मार्गशीर्ष शुद्ध १४ शके १८०४ चे पत्रांत लिहितात:—

( ५ ) "श्री० शिवाजी महाराजांस राज्यउपदेश वगैरे केल्याचें सर्व वाचून मनन केलें. त्यांपासून मनांत किती संतोष व विवेकबुद्धि आणि त्यापासून किती उपयोग, त्यास उपमा देण्याला जागा नाहीं. तर श्रीपाशीं रात्रंदिवस हीच विनंती करीत आहों कीं, असे बुद्धिमान् पुरुष लोकोपकार करणारे-यांचें आयुष्य चिरकाल आणि बुद्धीचा प्रकाश आचंद्रार्क दिगंतरीं असावा."

एक गुजराथ देशांतील सुशिक्षित ग्रंथकार ता० १० आगष्ट १८८२ चे पत्रांत ह्मणतात.—

(૬) "આપનાં રચેલાં બે પુસ્તકો વાંચવામાં આવ્યાં. તેથી આપણા આર્યદેશનું અને આર્યજનોની પૂર્વસ્થિતિનું સારી રીતે ભાન થાયછે. એ વિશેની વિગતવાર ઉત્કૃષ્ટ યોગ્યતાનું જેટલું વર્ણન કરાય તેટલું થોડું છે. મૂળમાં તેજદાર હીરો ને તે વળી કુશળ કારીગરના હાથથી જડાયો પછી, તેની શોભામાં શું કહેવાનું—એ પુસ્તક ગુજરાતી ભાષામાં પણ હોવાની જરૂર છે. માટે—ગુજરાતી ભાષાના પુત્રોને વાસ્તે એનું ગુજરાતી ભાષામાં ભાષાંતર કરી બહાર પાડવાની ઉત્કંઠા થવાથી આપની પરવાનગી થવા માટે આ વિનંતી કરી છે. તે સ્વીકારી પરવાનગી અપવાની કૃપા કરશો એવી આશા છે. ધારેલી હોશ ઈશ્વર પાર પાડે તો આપનું નામ ગુજરાતી ભાષાના બાળકોમાં પણ અમર થશે."

एवढेच उतारे येथें देऊन बस करितों. या आवृत्तीलाही सर्वांकडून असाच उदार आश्रय मिळाल्यास मला व माझ्या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशक रा. रा. जावजी दादाजी, निर्णयसागर छापखान्याचे मालक, यांना स्वदेशसेवा अधिक उमेदीनें करण्यास उत्तेजन येणार आहे. इतकेंच सांगून ही प्रस्तावना पुरी करितों.

ता० १ सप्टेंबर १८८३ इसवी. पुस्तककर्ता.

# अनुक्रमणिका.

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |


भाग १—विषयप्रवेश. ... ... ... ... ... १

,, २—दादांचा उपदेश. ... ... ... ... ३

,, ३—दादांचें संकलित इतिवृत्त. ... ... ... २८

,, ४—महाराजांचा उपजत अंगस्वभाव व त्याजवर कांहीं विचार. ... ... ... ३७

,, ५—विषयोपन्यास... ... ... ... ... ४१

# पुणें–लालमहाल.

इसवी सन १६४७.

दादोजी कोंडदेव. शिवाजी महाराज.



शुद्ध बीजापोटीं ॥
फळें रसाळ गोमटीं ॥ १ ॥
तुकाराम.

# राजगुरु दादोजी कोंडदेव

## आणि

# छत्रपति शिवाजी महाराज.

## भाग १.

### विषयप्रवेश.

तों पूर्वेस उदेला अंशुमाळी ।
तेणें नाशिली तिमिरावळी ॥
विहंगम कूजती वृक्षडहाळीं ।
धेनु हंबाती वत्सांतें ॥

'श्रीधर.'

मार्गशीर्षाचा महिना निघाला. हेमंतऋतूचा कडक अंमल बसत चालला. पंचपंचउषःकाल झाला. प्रातःकाळची झिलीब पुढें निघाली. अंगास झोंबणारा गार वारा वाहूं लागला. पूर्वेस शुक्राची चांदणी चमकूं लागली; तिच्या प्रकाशानें पायवाटा स्वच्छ दिसूं लागल्या. तडीतापडी, वाटसरू, यात्रेकरू 'प्रातःस्मरामि' म्हणत मार्ग क्रमायास लागले. मुखमार्जन करून अग्निहोत्री धाबळ्या पांघरून हातांत कंदील घेऊन नदीवर प्रातःस्नानास निघाले. गणपतीपुढच्या सभामंडपांत दिव्यापुढें पोथ्या सोडून विद्यार्थी वेदघोष व शास्त्राभ्यास करीत बसले. घरोघर बायका घरधंद्यास लागल्या. जात्यांची घरघर व जात्यांवरचीं गाणीं सुरू झालीं.

कोंबडा आरवला. पूर्वेस तांबडें फुटलें. अरुणोदय झाला. आभाळांत नक्षत्रें निस्तेज दिसूं लागलीं. कावळे कावकाव करूं लागले, राघू, चिमण्या वगैरे पांखरें चिवचिव करूं लागलीं. चोरटे रात्रीस वांवा मारून सावांसारखे घरीं येत होते, त्यांस गस्तीचे

शिपाई कोतवालचावडीवर घेऊन गेले. वाड्यांत दप्तरकलमदान घेऊन पोतनीस रोजगुदस्तची कीर्द लिहित बसला.

आभाळ पांढरें फटफटीत झालें. माणसाला माणूस दिसूं लागलें. सडासारवण करून, रांगोळ्या घालून, वेणीफणी करून आणि आंगें धुऊन, स्त्रिया दधिमंथनास लागल्या. बाळंतिणीची शेकशेगडी करून बाळंत्याच्या मोटा घेऊन सुइणी नदीवर निघाल्या. कर्मनिष्ठ ब्राह्मण हातांत अर्घ्यजल घेऊन सूर्यमंडलाकडे पहात उभे राहिले.

सूर्यबिंब दृष्टिगोचर होऊन वासरमणीची तांबूस प्रभा पृथ्वीवर पसरत चालली. अग्निहोत्र्यांनीं होमशाळेंत अग्नीचें उद्धरण करून होमकुंडांत गोळा अर्पण केला. जोगेश्वरीच्या देवळांत जाऊन ब्राह्मणस्त्रियांनीं श्रीदेवीस पूजासंभार अर्पण केले, आणि एकमेकींस हळदकुंकूं देऊन त्या आपआपल्या घरीं गेल्या. आश्रित, कारकून, शिलेदार व स्नेही सखलादी टोप्या पांघरून दादांच्या समाचारास वाड्यांत आले. दादांचा हात पहाण्यास वैद्य आले. दिवाणखान्यांत सर्व लोक दादांच्या बिछान्याभोंवतीं येऊन बसले. डोक्यास रुमाल गुंडाळून शालजोडी पांघरून दादा लोडाला टेंकून बसले. ( दादा वृद्धदशेंत अगदीं वांकले होते, तरी त्यांच्या तेजःपुंज मुद्रेवरून ते मोठे धर्मपरायण, नीतिमान्, मुत्सद्दी आणि ज्ञाते पुरुष असावे असें सहज वाटे. ) पोतनिसानें रोजकीर्द आणिली, ती दादांनीं पुरी करून दिली. चौकीपहाऱ्यांच्या वर्दी ऐकून घेतल्या. वैद्यानें हात पाहून त्यांस श्वासकुठाराची मात्रा दिली.

प्रातःस्नान, तुळसीची पूजा, गाईची पूजा, वगैरे नित्यकर्म सारून जिजाबाईसाहेब ( महाराजांची मातुश्री ) दादांच्या समाचारास आल्या. घोड्यावरचा फेरफटका करून शिवाजी महाराजांची स्वारीही तेथें आली. मातुश्री व दादा यांच्या पायांवर डोई ठेवून महाराज दादांच्या शेजारीं बसले.

आज प्रकृतीस कसें वाटतें म्हणून जिजाबाईसाहेबांनीं दादांस विचारिलें. दादा म्हणाले, "आईसाहेब, आमच्यासारख्या पिकलेल्या पानाचा आतां भरंवसा काय? आजची शक्ति उद्यां नाहीं असें माझें शरीर निस्त्राण होत चाललें आहे. तुमच्या सर्वांच्या संतोषास्तव वैद्याचें औषध घेतों पण 'औषधं जान्हवी-तोयं वैद्यो नारायणो हरिः' हेंच आतां माझें औषध आणि हाच माझा वैद्य. मी वृद्ध व अशक्त झालों. माझ्या हातून आतां कारभाराची दगदग होत नाहीं. आजपासून जामदारखान्याच्या किल्ल्या [१]आबासाहेबांचे स्वाधीन करितों. त्यांनीं आतां आपल्या जहागिरीचा कारभार स्वतः पहावा. त्यांच्या बुद्धीचा अंकुर पाहून मला बहुत संतोष झाला आहे. आतां स्वबुद्धीनें चालण्यासारखें त्यांचें वयही झालें आहे. हा पुरुष पुढें चांगला नांवलौकिक मिळवील असें मला भविष्य दिसतें. आतां त्यांना शेवटच्या दोन हिताच्या गोष्टी सांगतों, त्या मात्र त्यांनीं चांगल्या लक्षांत ठेवून वागावें म्हणजे परमेश्वर त्यांचें कल्याणच करील."

असें म्हणून त्यांनीं बोलण्यास आरंभ केला. तें रसाळ व बोधपर भाषण आतां पुढच्या भागांत निरूपण करूं.

---

## भाग २.

### दादांचा उपदेश.

साच आणि मवाळ । मित आणि रसाळ ।
शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥ १ ॥

**ज्ञानेश्वर.**

**दादोजी कोंडदेव.**—"प्रातःकाळीं उठण्याबरोबर श्रीहरीचें नामस्मरण करावें. मी एक मृत्युलोकचा प्राणी आहें. इतरांसारखें मलाही एक दिवस मरणें आहे, असा विचार करून मग दिनचर्येच्य कामास लागावें, म्हणजे कुकर्म करण्याकडे मनाची

---

[१] शिवाजी महाराजांस आबासाहेब म्हणत असत.

प्रवृत्ति होत नाहीं. कोणी कांहीं फिर्याद घेऊन आल्यास मला आज फावत नाहीं असा जाब देऊं नये. जें ज्याचें म्हणणें असेल तें नीट ऐकून घेऊन त्याला खरा इनसाफ द्यावा. दिलेलें वचन पुरें करण्यासाठीं राज्यभ्रष्ट देखील व्हावें, पण सत्यभ्रष्ट कधीं होऊं नये.

दररोज घोड्यावरचा फेरफटका व कसरती कराव्या. पोटांत थोडी भूक शिलक ठेवून जेवण करावें, म्हणजे प्रकृति साफ राहते. याविषयीं एक दृष्टांत सांगतों. एक वैद्य एका गांवांत पोट भरण्यासाठीं जाऊन राहिला. त्याजकडे कोणीही औषध घेण्यास येईना. हा काय चमत्कार आहे म्हणून त्यानें चौकशी केली. तेव्हां त्यास समजलें कीं, तेथील लोक उद्योगी असून भूक लागल्याशिवाय खात नाहींत, आणि भूक लागल्यावरही बेतानें खातात. मग अशा गांवीं राहून काय उपयोग? असा विचार करून तो गांव सोडून तो लागलाच चालता झाला. तात्पर्य, खाण्यापिण्याचा नेमस्तपणा आणि कसरत हीं शरीराच्या आरोग्यास अवश्य आहेत.

स्वभाव लहरी नसावा. मोठेपणाची शेखी मिरवूं नये. "पुढच्यास ठेंच मागचा शहाणा" हें वाक्य लक्षांत ठेवावें. पूर्वी अमक्यावर अमकें संकट आलें होतें आणि अमुक युक्तीनें तो त्यांतून पार पडला किंवा पडता, हें ज्ञान पूर्वींचे इतिहास, बखरी व गोष्टी ऐकिल्यावांचून होत नाहीं. यासाठीं प्राचीन राजांच्या व देशांच्या बखरी व इतिहास वाचीत व ऐकत जावे.

शहाणपण असलें तरी गर्वानें फुगूं नये. संपत्तीचा अभिमान धरूं नये. ती दोनप्रहरच्या सांवलीसारखी चंचल आहे. प्रपंच हा एक सोंगट्यांचा डाव आहे. त्यांत नेहमीं जुगदानच पडेल असा भरंवसा नाहीं. या मृत्युलोकच्या वस्तींत सर्वज्ञ असून निरभिमान रहावें. चौघांमध्यें छि:थू होईल असें वागूं नये. दुष्ट लोकांची संगति धरूं नये. परमेश्वराचे ठायीं दृढ निष्ठा व मनुष्यमात्रावर प्रेम ठेवणें हेंच वेदाचें मुख्य सार आहे. गोडीच्या पोटीं सर्वांकडून कामें घेऊन त्यांच्या मनांचें आकलन करणें हीच राजनीतीची

गुरुकिल्ली आहे. अपमानापेक्षां मृत्यु बरा अशी बुद्धि ठेवावी. जेथें तेथें आपलेंच शहाणपण मिरवूं नये. एखाद्यानें सांगितलेल्या हितबुद्धीचा अंगीकार करावा. दुसऱ्याची मात्रा चालूं देणारच नाहीं असा दुराग्रह नसावा.

मोठे लोकांना आपलें हिताहित किंवा सत्यासत्य कळण्याचें साधन फार थोडें असतें. जवळचे बरेच लोक स्तुतिपाठक असतात. निर्भीडपणानें खरी गोष्ट सांगणारा विरळा. एकदां एखाद्याला स्तुतिपाठ ऐकण्याची संवय लागली म्हणजे सत्य सांगणारा कोणी भेटला तर त्याचें भाषण त्यास आवडेनासें होतें. स्तुति प्रत्येकास प्रिय असते. मोठ्याची तोंडावर निंदा करणारे फार थोडे असतात. म्हणून संभावित लोक आपणांविषयीं काय बोलतात तें समजण्याविषयीं उत्सुकता असली तरी त्याजविषयीं त्यांस अज्ञानांत रहावें लागतें. परंतु अशा स्तुतिपाठ करणाऱ्या लोकांच्या जाळ्यांतून सुटण्याला एक मार्ग आहे तो हा कीं, आपल्या वर्तणुकीवरून लोकांची अशी खात्री असली पाहिजे कीं, कोणीं तरी गोष्ट सांगितली असतां आपणांस राग येत नाहीं; परंतु अशा खऱ्या गोष्टी सांगण्याचीही सवड सरसकट सर्वांस देतां कामा नये. सर्वांस बोलूं दिलें तर लोक निर्भीड आणि निर्भय होऊन आपला बोज रहात नाहीं, व आपणांविषयीं लोकांची पूज्यबुद्धि नाहींशी होते. याकरितां आपल्या सहवासाला किंवा पदरीं जे चार सुज्ञ गृहस्थ असतील त्यांसच ही मोकळीक असावी व त्यांतही ती पाहिजे त्या कामांत नसावी. जेवढ्या गोष्टींत तुम्ही त्यांचा सल्ला मागाल तेवढ्यापुरतेंच त्यांनीं आपलें म्हणणें किंवा अभिप्राय कळवावा. मग त्याजविषयीं आपल्या मनाशीं चांगला विचार करून निश्चय करावा; परंतु एकदां निश्चय झाला म्हणजे तो सहसा ढळूं नये. आपल्या वर्तनावरून लोकांना असें वाटत असावें कीं, आम्ही जितके जितके निर्भीड व सत्यवक्ते असूं तितकें तितकें आम्हांवर यजमानाचें अधिक प्रेम बसेल. जो दुसऱ्याच्या चांगल्या उपदेशावर विश्वास न ठेवतां प्रत्येक मनु-

त्याचा अभिप्राय विचारीत सुटतो, आणि क्षणोक्षणीं आपले बेत फिरवितो, त्याला लोक क्षणिकबुद्धीचा असें म्हणतात. चार सल्लेदार आपआपल्या समजुतीप्रमाणें सल्ला देतात. तरी सर्वांचें ऐकून घेतल्यानें त्यापैकीं काय कबूल करावें आणि काय न करावें याचा निश्चय करण्यास मार्ग होतो. म्हणून दुसऱ्याला विचारण्यांत आपला उणेपणा आहे असें कधींही समजूं नये.

देशपर्यटण करावें. त्याच्या योगानें बारा मुलखांची माहिती होऊन अंगीं चातुर्य येतें. घरांत बसून आयत्या पिठावर रेघट्या ओढणारास लोकांत मान नाहीं. त्यास 'कूपमंडूक' म्हणजे आडांतला बेडूक किंवा चुलकोंबडा असें म्हणतात. 'बसे तो फसे आणि फिरे तो चरे' ही म्हण लक्षांत ठेवावी. फाटल्या ठिकाणीं टांके मारीत बसणें हा पुरुषधर्म नव्हे.

प्रसंगोपात्त एखाद्याची हितबुद्धि घ्यावी. तरी पावलोपावलीं दुसऱ्याच्याच तंत्रानें वागण्याची खोड नसावी. प्रपंचांत जयापजय ह्या गोष्टी कोणाच्या हातच्या नाहींत. काळ फिरला म्हणजे फर्जीचा प्यादा आणि प्याद्याच्या फर्जी होतो. रागाच्या भिरिरींत कोणाला गालिप्रदान करूं नये. कांहीं कारणानें पोटांत क्रोध उठल्यास तो विवेकानेंच शांत करावा. विकट प्रसंग धैर्यानें मारून न्यावे. उतावळी करूं नये. ईश्वरानें कल्पनाशक्ति दिली आहे, तिच्या योगानें निमिषार्धांत अंतःकरणांत प्रतिसृष्टि उभी करितां येते. यासाठीं जें आपणांस चर्मचक्षूनें दिसत नाहीं तें ज्ञानचक्षूनें पाहून त्याचा निर्णय करावा. मी काय तो थोर आणि इतर जीवकोटी तुच्छ, अशी अहंपणाची बुद्धि नसावी. कोटीवर प्रतिकोटी करून वाक्‌चातुर्यानें वादांत जय मिळवावा. भाषण मृदु, मधुर व चित्तवेधक असावें; तथापि त्यांत भित्रेपणा किंवा लेंचेपण असूं नये. सदा आनंदसुख असावें. हें बहिरंगापुरतें सांगितलें. अंतरंगीं शौर्य, सौजन्य, क्षमा, विनय, शुद्धबुद्धि, राजकार्यधुरंधरता, हे गुण असावे. नुसत्या बाह्यरंगास न भुलतां कोणाचें अंतरंग कसें आहे याची चांगली परीक्षा करावी. तरवारीची खरी किंमत तिच्या

सोनेरी बुट्टीदार मुठींत किंवा मखमलीच्या म्यानांत नसते. तिची खरी योग्यता तिच्या पोलादी पानांतच असते.

खाणें, पिणें, निद्रा ह्या गोष्टी आपल्या आहारीं ठेवाव्या. कार्यांत जडजोखिमाचीं कामें आस्ते आस्ते करावीं. 'पी हळद कीं हो गोरी' अशी घाई करूं नये. उत्तम ज्याचें व्रत तोच सत्पुरुष होय. मोहरीएवढ्या अपराधास मेरूएवढा जड करूं नये. आडमार्गानें जाणारास मधुर भाषणानें व उद्बोधानें ताळ्यावर आणावें. कडू औषधास साखरेचें अनुपान वैद्य सांगतात; याचें कारण हेंच कीं, अनुपानाच्या माधुर्यानें औषध पोटांत जाऊन रोग्यास आरोग्य व्हावें. योजिलेली मसलत फसली किंवा लंगडी पडली तरी त्या गोष्टीचा खेद करीत बसूं नये. केलेले सर्वच बेत सिद्धीस जातात असें घडत नाहीं. 'एक ठेंच खाई आणि बावन वीर होई.' ठेंचा खातां खातां शहाणपण येतें. हातीं धरलेल्या कामीं चित्ताची एकाग्रता ठेवावी. मन गढल्याखेरीज काम चांगलें शेवटास जात नाहीं. 'आठ हात लांकूड आणि नऊ हात ढलपी' अशा बाता झोंकणारावर विश्वास ठेवूं नये. सभाधीटपणा असावा. रास्त इनसाफ वाटेल तो भीड न धरितां स्पष्ट सांगावा. ईश्वरभीति, भूतदया, स्वधर्मनिष्ठा, लोकलज्जा, परलोकचिंता आणि लौकिक, ह्या सर्व गोष्टींचें स्मरण ठेवावें.

पोष्य वर्गाच्या हातून कांहीं चुकी घडल्यास त्याच्या पाठीवर मारावें पण पोटावर मारूं नये. म्हणजे तोही आपल्या पोषक अन्नदात्यावर कांहीं प्रसंग गुजरल्यास त्याला आपल्या पाठीशीं घालून त्याचे प्राण वांचवितो. प्रथम एखाद्या गोष्टीचा आगापिछा पाहिल्याखेरीज 'हो, तें काम ना ? मी हटकून करीन' अशी एकाएकीं तोंडाची वाफ दवडूं नये. आणि पुरा विचार करून दिलेलें वचन व केलेली प्रतिज्ञा शेवटास न्यावी. याच गुणांनीं भीष्माचार्य, द्रोणाचार्य, कर्ण, इत्यादि वीरांचीं अद्यापि नांवें निघत आहेत.

भांग, गांजा, अफू, दारू अशा मादक पदार्थांपासून दूर रहावें. दारूचा आपल्या धर्मशास्त्रांत बहुत निषेध केला आहे.

'बोलणें पांटीभर आणि अर्थ चिमुटभर' असें वायफळ भाषण करूं नये. तें मित असून त्यांत मतलब व अर्थगौरव पुष्कळ असावा व तें मर्मभेदक नसावें.

'गोड करून खावें आणि मऊ करून निजावें' अशी वृद्धपरंपरया चालत आलेली म्हण आहे. तिचा अर्थ पंचपक्वान्नी जेवण व पराच्या गाद्या असा नाहीं. तर भूक लागली म्हणजे खावें आणि झोंप आली म्हणजे निजावें. म्हणजे भाजीभाकरीचें साधें जेवण मिष्टान्नापेक्षांही रुचकर लागतें; आणि दगड उशाला घेऊन भुईवर अंग टाकलें तरी गाढ झोंप येते, म्हणूनच "भुकेस कोंडा व निजेस धोंडा" अशी म्हण पडली आहे.

जो आधीं दुःख सोशितो त्याला पुढें सुख मिळतें. दिवसास जो आंग मोडून काम करितो त्याला रात्रीं गाढ झोंप येते. आठ महिने जो खपतो त्याचे पावसाळ्याचे चार महिने सुखानें जातात. पूर्ववयांत जो सावध असतो त्याचा वृद्धापकाळ आनंदांत जातो, आणि जिवंत असतांना जो सन्मार्गांत असतो त्याला मरणोत्तर कीर्तिसुख आणि सद्गति प्राप्त होतात.

वाईट खोड जशी लौकर जडते तसा चांगला गुण लौकर लागत नाहीं यासाठीं ज्याचा सहवास असेल त्याच्यामध्यें त्याज्यांश असेल तेवढा टाकून ग्राह्यांश असेल तो मधमाशीप्रमाणें घ्यावा. कडू बदामाबरोबर साखरही कडू लागते. हा कुसंगतीचा गुण आहे. जो पुरुष जिवंत असतांना मी मृतवत् आहें असें समजतो तो मेला तरी लोकांत जिवंतच असतो.

जसा काष्ठांत असलेला अग्नि घर्षणाशिवाय बाहेर पडत नाहीं, तसा बुद्धि हा पदार्थ ज्ञानसंपादन आणि सुसमागम यांच्याशिवाय प्रदीप्त होत नाहीं. पण त्या बुद्धीची योजना मात्र यथास्थित झाली पाहिजे. नाहीं तर अग्नीप्रमाणें तिच्यापासूनही भलभलतेच परिणाम घडतात. बुद्धिवैपरीत्यानें आपलीच क्रिया आपणास मारक होऊन त्यानें उपाय न होतां अपाय घडतात. यासाठीं जेथें तुम्हांस कांहीं कळत नसेल तेथें

तुमच्यापेक्षां बुद्धीनें, विद्येनें व वयानें श्रेष्ठ असतील त्यांस पुसून जें करणें तें करावें. पुष्कळ बकबक करणाऱ्या लोकांच्या नादीं न लागतां सारासारविचारानें ज्याचें म्हणणें बरें दिसतें तें घ्यावें.

माझें ज्ञान अपुरें आहे असें ज्या शहाण्याला वाटतें तो शहाण्यांमध्यें शहाणा, आणि माझ्यासारखा ज्ञानसंपन्न कोणी नाहीं असें ज्या मूर्खाला वाटतें तो मूर्खांतला महामूर्ख समजावा. श्रीमानाला विद्वानाची योग्यता कळत नाहीं; पण विद्वानाला धनाची किंमत समजते. विद्येनें श्रीमान् होतात; पण जवळ पैका पुष्कळ असल्यानें श्रीमानाला कोणी विद्वान् म्हणत नाहीं. तेव्हां श्रीमंतापेक्षां विद्वानाची योग्यता अधिक आहे. सबब श्रीमंतानें विद्वानाचा सन्मान करीत जावा, आणि अविद्वान् व दुर्जन यांजपासून दूर रहावें. त्यांच्या वाऱ्यासही उभें राहूं नये. कावळा मूळचा काळा आहे. त्याला रोज दूध पाजिलें किंवा दुधानें आंघोळ घातली तरी तो कावळयाचा बगळा होईल काय? कडू कारलें साखरेंत घोळलें आणि तुपांत तळलें, किंवा साखरेंत पुष्कळ दिवस पुरून ठेविलें तरी तें कधीं गोड होईल काय? कोळसा पुष्कळ दिवस दह्यांत बुडवून ठेविला तरी तो कधीं पांढरा होईल? तसा दुर्जनाचा मूळचा स्वभाव कृत्रिम उपयांनीं कधीं बदलावयाचा नाहीं.

अल्पस्वल्प अपराधास पात्रापात्र पाहून थोडाबहुत दंड करावा. या, बसा, असा सत्कार न करणें, अगदीं भाषण न करणें किंवा कांहीं वेळ मौन धरणें, असे अल्प दंडाचे बहुत प्रकार आहेत. त्यांचा यथाकालीं उपयोग करीत जावा म्हणजे पुन्हां तसे अपराध न करण्याविषयीं चाकरमाणसें खबरदारी ठेवितात.

ऋण काढून सण करूं नये. 'असेल तेव्हां दिवाळी आणि नसेल तेव्हां होळी' असें करणें हें मूर्खाचें लक्षण होय. पोशाख दिमाखाचा व डौली नसावा. अंगीं विद्या व हुन्नर कितीही असलीं तरी फुशारकी मिरवूं नये. ज्यानें एवढें अवाढव्य स्थावर-जंगमात्मक विश्व निर्माण केलें त्या स्वयंप्रकाश ज्ञानसूर्यापुढें

आमच्या कांडव्रातीचा पीड किती असा विचार करावा. मीं जन्मास येऊन केलें काय आणि करावयाचें काय हें आपल्या मनाला नित्य पुशीत जावें. 'जेवीन तर तुपाशीं; नाहीं तर उपाशीं' असा दुराग्रह न धरितां ज्या काळीं जेवढा लाभ होईल तेवढाच लखलाभ समजावा. आणि परमेश्वराच्या कृपादानाचें सदोदित स्मरण ठेवावें.

हुजरे, खिजमतगार वगैरे संनिध रहाणारीं चाकरमाणसें धन्याकडे टक लावून बसतात. धनी काय बोलतो तें कान देऊन ऐकतात. आणि त्याच्या बोलण्याचे भलभलतेच अर्थ करून नाहीं नाहीं त्या गप्पा बाहेर पसरितात. यासाठीं गुप्त मसलत करणें ती एकांतीं करावी.

नाच, बैठका, तमासे यांत पैशाची उधळपट्टी करूं नये. द्रव्याचा असद्व्यय केला असतां 'मेहनती दिलगीर आणि चोरटे खुशाल' असें होऊन राज्यांत दुर्व्यसनांचा फैलाव होतो.

'आंथरूण पाहून पाय पसरावे' म्हणजे आदा पाहून खर्च करावा. प्राप्तीचा तिसरा हिस्सा शिल्लक ठेवून बाकीचा खर्च करावा. प्राप्तीपेक्षां ज्याचा खर्च कमी तो श्रीमान् व प्राप्तीपेक्षां ज्याचा खर्च अधिक तो दरिद्री समजावा. जो स्वपराक्रमानें कमाई करून श्रीमान् होतो तोच अक्कलवान् व श्रीमान् खरा. अजागलस्तनासारखे आयुष्याचे दिवस वृथा घालवूं नयेत. मनुष्य-जन्माचें कांहींतरी सार्थक्य करावें.

सशाच्या शिकारीस वाघाच्या शिकारीची तयारी ठेवावी. धर्माधर्म, न्यायान्याय आणि स्वपरबलाबल जाणून जें करणें तें करावें. प्रणतत्राणीं हात जागृत ठेवावा. आणि सर्व कामांत सारासारविचार करावा. सारासारविचारावांचून मनुष्यांत मनुष्य-पणा येत नाहीं. खऱ्यांतून खोटें निवडण्याचा अभ्यास करीत जावा.

कुल, शील, तारतम्य, तारुण्य, रूप, दौलत व संतति ह्या सर्व गोष्टी अनुकूल असल्या तरी अभिमान कामाचा नाहीं. हांडाभर दूध मोहरीएवढ्या मिठाच्या खड्यानें नासतें. तसें थोड्याशा

गर्वाच्या विटाळानें सर्व सद्गुणांची मृ[illegible] होते. [illegible]शांत [illegible]
पुण्य कशांत ह्याचा विचार करीत जावा. स[illegible]लणाराचे मनोरथ ईशकृपेनें परिपूर्ण होतात.

राजाची नीति सुटली म्हणजे कांहीं कालांतरानें त्याचा नाश होतो. प्रसंगविशेषीं प्रजेच्या हातूनच तो आपल्या बंधुवर्गासह प्राणासही मुकतो. शिरा तुटल्या म्हणजे शरीरांतले प्राण जसे व्याकुल होतात, तसें प्रजेला धक्का बसला म्हणजे राजाचें राज्य लयाचे पंथास लागतें. अनीतिमान् राजे संकटार्णवांत सांपडून आपल्या राज्यासह बुडतात. पूर्वीं या भरतखंडांत वेन या नांवाचा एक राजा होऊन गेला, तो मोठा दुष्ट होता. त्याचा प्रजेनेंच वध करून त्याचें राज्य पृथुराजास दिलें, अशी भागवतांत कथा आहे.

राजानें न्यायासनारूढ झाल्यावर आप्तपणा, प्रतिष्ठा व उपकार हे विचार एका बाजूस ठेवावे.

'श्रुताध्ययनसंपन्ना धर्मज्ञाः सत्यवादिनः ॥
राज्ञा सभासदः कार्या रिपौ मित्रे च ये समाः ॥ १ ॥'

म्हणजे बहुत अध्ययन केलेले, बहुश्रुत, धर्माचें खरें तत्त्व जाणणारे, सत्य भाषण करणारे, कोणाचा विडा, पाणी सुद्धां न घेणारे, निष्पक्षपाती, न्यायनिष्ठुर आणि न्यायनिपुण असे न्यायाधीश असावे म्हणून व्यवहारमयूखांत सांगितलें आहे. तसेंच,

'देशजातिकुलानां च ये धर्माः प्राक् प्रवर्तिताः ॥
तथैव ते पालनीयाः प्रजा प्रक्षुभ्यतेऽन्यथा ॥ १ ॥
केवलं शास्त्रमाश्रित्य न कर्तव्यो हि निर्णयः ॥
युक्तिहीने विचारे तु धर्महानिः प्रजायते ॥ २ ॥'

म्हणजे न्यायाधीशानें केवळ शास्त्रावरच अवलंबून राहूं नये. देशाचार, कुलाचार, पूर्वापार चालत आलेले जातिधर्म यांजवर लक्ष देऊन निर्णय करावा. तसें न केलें तर प्रजा राजास नाराजी होऊन राज्यांत अनर्थ माजतात; अशी मनूनें राजनीति सांगितली आहे. व्यापार, विभाग, इनामजमिनी, गांवकीचे व शिंवेचे तंटे, यांचे गांवच्या पंचांकडून निकाल करवावे.

बाहेरची चोरबातमी काढून आणण्यास चांगले चांगले हुशार हेर किंवा जासूद चाकरीस ठेवावे. सल्ला मसलत देण्यास जवळ उत्तम मंत्री असावे. इमारतीस जसे खांब तसे राज्यास मंत्री होत. ते विद्या, विनय, सौजन्य, निर्लोभता स्वधर्मश्रद्धा, स्वराजनिष्ठा, स्वजनप्रीति, शौर्य, दूरदृष्टि व राजकार्यधुरंधरता या गुणांहीं युक्त असावे. त्यांची राजकीय कामांत राजानें मसलत घ्यावी; तरी बुद्धिकौशल्यानें त्या सर्वांवर त्यानें आपली छाप ठेवावी. राज्याची सर्व लगाम आपल्या हातीं ठेवून त्यानें राजधर्म व राजक्रिया स्वतः चालवाव्या. राज्यकारभारांत राजा व प्रधान या दोघांमध्यें एकवाक्यता असावी. म्हणजे राज्ययंत्र सुरळीत चालतें, कनक आणि कनकाची कांति, घट आणि घटाची माती, वस्त्र आणि वस्त्राचे तंतु, किंवा सूर्य आणि सूर्याची प्रभा, ह्या वस्तु जशा एकमेकांपासून निराळ्या करतां येत नाहींत, तसें राजा व मंत्री ह्या दोघांमध्यें एकात्मता असावी. आबाजी सोनदेव, संभाजी कावजी, शामराजपंत, नेटाजी पालकर, रघुनाथपंत, नरहर बल्लाळ, मोरोपंत पिंगळे, बाळाजी आवजी, निराजीपंत, निळोजी काटकर, सोमनाथपंत, गोमाजी नाईक, अण्णाजी दत्तो, बाळकृष्णपंत हणमंते, हंसाजी मोहिते, कार्टोजी गुजर, विठ्ठल पिलदेव, शेषाप्पा नाईक पुंडे, हे आपल्या पदरचे कदीम नौकर आहेत. हीं सर्व माणसें हत्तीच्या तोलाचीं आहेत. त्यांच्यावर तुमची सदोदित कृपा असावी.

जेव्हां गांवाचा, देशाचा किंवा सरकारी कामाचा संबंध असेल तेव्हां कोणाची जातपात मनांत आणतां कामा नये. जशी ज्याची लायकी तशी त्याला कामगिरी सांगावी. कारण हत्तीचें ओझें हत्तीच उचलूं जाणे. इतरांच्यानें तें व्हावयाचें नाहीं.

महाभारतांत अनेक वीरांच्या कथा आहेत. त्यांतील विराटपर्व, वनपर्व, भीष्मपर्व, द्रोणपर्व, कर्णपर्व, शल्यपर्व, गदापर्व, सभापर्व, उद्योगपर्व, अश्वमेधपर्व, हीं पर्वें नेहमीं ऐकत जावीं. त्यांत महावीरांचीं युद्धं आणि कितीएक ऋषींचे राजांस ज्ञानोपदेश आहेत ते फार सुरस असून लक्षांत धरण्याजोगे आहेत. रामायणांत-

त्याही कथा ऐकत जाव्या. त्यांत सांगितलें आहे कीं, लढाईंत शत्रूकडच्या बायका, सरदार व शिपाई पाडाव होऊन हातीं लागल्यास त्यांचा छळ करूं नये. घायाळ लोकांच्या जखमा बऱ्या करून त्या सर्वांस वस्त्रालंकारांनीं गौरवून, गोड शब्द बोलून, त्यांचा आदर करून इतमामानिशीं त्यांच्या मुलुखांत त्यांस जाऊं द्यावें. असें उदार मन केलें तर साक्षात् यमासारखा क्रूर शत्रु असला तरी तो मेणापेक्षांही नरम होतो, आणि त्याचा क्रोधाग्नि आपोआप शांत होतो.

दुसऱ्याचा मानमरातब ठेवण्याच्या बहुत रीति आहेत, त्या लक्षांत ठेवाव्या. जसा ज्याचा दर्जा व मोठेपणा तसा त्यास मान द्यावा. जशी ज्यानें कामगिरी बजाविली असेल तसें त्यास पागोटें, शालजोडी, मंदील, शिरपेंच, तुरा, तरवार, घोडा, पालखी, अबदागीर किंवा जमीन बक्षीस द्यावी. सणावाराच्या दिवशीं दरबार भरून तेथें मानकरी, सरदार, शिलेदार, कारभारी, गांवचे शेटसावकार व प्रमुख लोक यांच्या भेटी घेऊन त्यांस कुशलप्रश्न विचारावे; म्हणजे परस्परांत प्रेमभाव कायम राहून उभय पक्षांचें कल्याण होतें. गांवकीच्या बंदोबस्तासाठीं बारा बलुतीं व बारा अलुतीं ठरलेलीं आहेत. त्याप्रमाणें ज्यांचीं त्यांजकडे वतनें, जमिनी व हक्क अबाधित चालवून त्यांजकडून तीं तीं कामें घेत जावीं; म्हणजे देशांत स्वस्थता राहून लोक सुखी असतात.

ज्यांत यश मोठा आणि लाभही मोठा अशा कामांत चित्त व हात घालावा. लोककल्याणार्थ विहिरी, तलाव, धर्मशाळा, ओहऱ्या, चावड्या व घांट बांधावे, व जुन्यांचे जीर्णोद्धार करावे. राजानें देवस्वापहार व धर्मस्वापहार करूं नये. देवस्थान व धर्मादाय यांच्या नेमणुका वर्षासनें, वतनें, वृत्ति व इनाम दिलेल्या जमिनी ज्यांच्या त्यांजकडे अबाधित चालवाव्या. यवन राजांनीं यवनांस देणग्या व नेमणुका करून दिल्या असतील त्याही चालवाव्या, म्हणजे सर्व जातींची प्रजा संतुष्ट राहील. मुसलमानी राजांतही अकबर व फेरोजशहा यांच्यासारखे कितीएक धर्मराजे

होऊन गेले. त्यांच्या बखरी वाचून शहाणपण शिकावें. पण त्यांच्यांत तैमुरलंगासारखे कितीएक अविचारी व क्रूर राजे होऊन गेले; त्यांनीं तर क्रूरपणाची कमाल करून सोडिली. हिंदूंचीं देवालयें फोडून त्यांतील मूर्तींचे पाटेवरवंटे केले. हिंदूंच्या पोथ्या पुस्तकें जाळून फस्त केलीं. कैक हिंदू स्त्रियांच्या पातिव्रत्याचा भंग केला. कैकांस जुलमानें मुसलमान बनविलें. अशा रीतीनें त्यानें हिंदू धर्माची पायमल्ली केली. प्रजा निष्कांचन करून टाकिली. खोऱ्यामुऱ्यांत राहाणारे गरीब लोक खडखडीत उपास काढूं लागले. हिंदुलोक छाटी लंगोटीस सुद्धां महाग झाले. तर या त्यांच्या कृत्यापासूनही सद्बोध घेण्यासारखा आहे तो टाकूं नये.

राजा ही प्रजेची माउली आणि प्रजा हीं तिचीं लेंकरें, अशी परंपरा चालत आलेली आहे. जशीं एका आईचीं लहान लहान मुलें असतात, त्यांना भूक लागली म्हणजे तिला पान्हा फुटतो, त्यांना ती मांडीवर घेऊन ममतेनें पाजते, त्यांस झोंप येऊं लागली म्हणजे पाळण्यांत घालून जो जो म्हणून ती दोरी हालवीत बसते. मग तीं मुलें आईच्या गाण्याच्या नादांत झोंपीं जातात, अशा रीतीनें वाढविलेलीं मुलें लहानाचीं मोठीं होऊन पुढें आपल्या आईचा पांग फेडितात; तद्वत् प्रजा हीं राजाचीं मुलें आहेत. तीं त्याच्या कृपाछत्राखालीं वाढून त्याजवर कधीं संकट आलें असतां त्याचें एका जुटानें निवारण करून त्याचें संरक्षण करितात, आणि 'दहा मरोत पण दहांचा पालनवाला न मरो' असे आपल्या राजाविषयीं उद्गार काढितात. राजाची मुख्य देवपूजा हीच कीं, त्यानें आपल्या पदरीं चांगले सुज्ञ कारभारी ठेऊन त्यांकडून प्रजेचा यथान्याय प्रतिपाळ करवून तिची प्रीति संपादन करावी. प्रीति संपादन करण्याचें काम मोठ्या श्रमाचें आहे असें नाहीं; तिच्यावर ममत्व ठेवणें आणि आपणाविषयीं तिच्या ठायीं सरळ भाव उत्पन्न होई असें आपलें आचरण ठेवणें हीच लोकप्रीतिसंपादनाची गुरुकिल्ली आहे. राजा प्रजेवर प्रीति करीत असला म्हणजे प्रजाही आपल्या प्रजाधर्माचें कधीं उल्लंघन करीत नाहीं.

राजानें राजधर्मास अनुसरून प्रजेकडून करभार घ्यावा आणि प्रजाधर्मास अनुसरून प्रजेनेंही तो राजाला खुशीनें द्यावा हें विहित आहे; पण जसा फुलाच्या पांकळीला न दुखवितां फुलांतील मधाचा अंश मधमाशी युक्तीनें काढून घेते, किंवा, झाड कायम ठेवून त्याजवर आलेलीं फळें व पुष्पें मनुष्यें काढून घेतात, तशी प्रजेची मगदूर पाहून तिला पीडा न देतां नीतिमान् राजानें तिजकडून राजभाग घ्यावा. कधींकधीं प्रजेचा बचाव होण्यासाठीं राजाला लोभाची दोरी जरा सैलही सोडावी लागते. शुकाचार्यांनीं परीक्षिति राजास असें सांगितलें आहे कीं, 'राजा, जो राजा प्रजेस नानाप्रकारच्या पीडा देऊन तिजपासून द्रव्य हरण करितो, जो तिच्याशीं सत्यता ठेवीत नाहीं, मिथ्या भाषण करितो, आणि तिची वंचना करितो, त्या राजाला अधोगति प्राप्त होते.'

न्याय करितांना गंगेच्या डोहासारिखें चित्त स्थिर ठेवावें. घाईनें व क्रोधानें केव्हां केव्हां हरभऱ्याबरोबर बरडही चिरडल्यासारखें होतें. अतिक्रोध कामाचा नाहीं. क्रोधाधीन न होतां त्याला आपल्या कबजांत ठेवावें. दुसऱ्यावर रागावणें म्हणजे त्याच्या अपराधाबद्दल आपणाला शासन करून घेतल्यासारखें होतें. गोड व रसाळ आम्रफळाला जसे पक्षी टोंचितात, तसे दयाळु राजाला लोक वारंवार त्रास देतात. तरी त्यांचा त्यानें तिरस्कार करूं नये. उत्तम काम करणाराची 'शाबास चांगलें काम केलेंस' अशी वाहवा करावी म्हणजे त्याला मूठभर मास आल्यासारखें होतें. जीं माणसें आपल्या कामीं येतात त्यांच्या निराधार कुटुंबाचा चांगला संभाळ करावा, म्हणजे सेवक लोक आपआपलीं कामें मन लावून करितात.

स्वार्थ आणि परमार्थ ह्या दोहींचें साधन करण्यास श्रीमान् लोकांस व राजांस जशा सोई असतात तशा इतरांस नसतात. याविषयीं एक कथा सांगतों. अकबर बादशाहानें एकदां बिरबलास चार प्रश्न केले, ते व त्यांचीं बिरबलानें उत्तरें दिलीं तीं अशीं:—

| प्रश्न. | उत्तर. |
|---|---|
| १ येथें आहे पण तेथें नाहीं ... | १ वेश्या. |
| २ येथें नाहीं पण तेथें आहे ... | २ ईश्वरोपासनेंत काळ घालविणारा. |
| ३ येथें नाहीं व तेथेंही नाहीं ... | ३ आगांतुक किंवा भिकारी. |
| ४ येथें आहे व तेथेंही आहे असा कोण? ............ | ४ श्रीमान् व नीतिमान् पुरुष. |

यांचा भावार्थ असाः—वेश्या स्त्री येथें सौख्य भोगिते, पण तिला पुढें गती नाहीं. ईश्वरोपासनेंत काळ घालविणारास येथें सौख्य नाहीं, पण मरणोत्तर त्यास स्वर्गसुख असतें. आगांतुक किंवा भिकारी ह्याच्या हातून कोणतेंच सत्कर्म घडत नाहीं, ह्यामुळें त्याला 'इदं च नास्ति' आणि 'परं च न लभ्यते' असें होऊन तो दोन्ही लोकांस मुकतो. आतां शेवटास श्रीमान् व नीतिमान् पुरुष हा मात्र द्रव्याचा येथें सद्व्यय करील तर त्यास इहलोकचीं सौख्यें मिळून परलोकप्राप्तिही होते; म्हणून त्यास स्वार्थ आणि परमार्थ हे दोन्ही साधतात. म्हणजे तो येथें आहे व तेथेंही आहे. तर ही गोष्ट लक्षांत ठेवून तुम्ही प्रपंच आणि परमार्थ ह्या दोहोंचेंही साधन करा.

पागेंत घोडे चांगले ठेवाचे. त्यांजवर पाळीपाळीनें बसून फेरफटका करावा. मोतद्दाराकडून त्यांची चांगली शुश्रूषा करवावी. केव्हां केव्हां त्यांच्या पाठीवरून ममतेनें हात फिरवावा. त्यांची पाठ व पुट्ठा थापटावा. तोंडें कुरवाळावीं. त्यांची चंदी, चारा, पाणी, चाकरी, यांजवर जातीनें पैरवी ठेवावी. प्रत्येकास निरनिराळें नांव ठेवून त्या त्या नांवांनीं त्यांस दुरून हांक मारावी, म्हणजे ते आपल्या धन्याची पुरी ओळख ठेवितात.

स्वारीशिकारीच्या वेळेस तवा, तोबरा, पाणदोरी, पाणलोटा, इतकी सामग्री आपआपल्या घोड्यावर बाळगावी. समरंगणीं

युद्धास उभें राहिल्यावर तेथें आप्तस्वकीयांचा विचार न करितां त्यांच्याशीं सामना करावा. भगवद्गीतेंत श्रीकृष्णांनीं अर्जुनास सांगितलें आहे कीं:—

'क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥
कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ॥
स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्न कर्मकृत् ॥
शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाऽप्यपलायनम् ॥
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥
सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ॥
सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ॥
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥

म्हणजे, 'अर्जुना, हा आप्तवर्ग पुढें उभा आहे. त्यास मी कसा मारूं. मला पाप लागेल. अशी तूं शंका मनांत आणूं नको; कारण, जो आपणांवर शस्त्र उगारील त्याजवर आपण शस्त्र उगारणें हा क्षात्रधर्मच आहे. असें करण्यांत अधर्म नाहीं. कर्मांत अकर्म कोणतें आणि अकर्मांत कर्म कोणतें याचा निवाडा करण्याचें काम कठीण आहे. त्याचा भार मजवर टाकून तूं स्वस्थचित्तानें आपलें कर्म कर म्हणजे त्यांतच तुला मुक्ति आहे.'

ज्याच्या उदरीं आपण जन्म घेतलें त्या मातापितरांचा सन्मान राखून त्यांच्या आज्ञा वेदवचनांप्रमाणें शिरसा मान्य कराव्या. जे पुत्र वडिलांचा मान ठेवितात, त्यांच्या पुढें जय आणि लाभ हात जोडून उभे असतात. तुमचे वडील बंधु संभाजी कर्नाटकांत कनकगिरि किल्ल्याशीं लढाई चालत असतां तींत पतन पावले, तेव्हां तुमचे वडील व मातुश्री यांस बहुत शोक झाला. मग आईसाहेबांचा सर्व जीव तुम्हांकडेसच लागून राहिला. तुम्ही शिवनेरीच्या किल्ल्यांत जन्मलां, त्या वेळेस राज्यांत मोठी धामधूम चालली होती. अहमदनगरच्या राज्याच्या तर्फेनें शहाजी राजे मोंगलांशीं मोठ्या निकरानें लढत होते. तिकडे शिवनेरी किल्ल्यावर आईसाहेबांस मोंग-

त्यांच्या लोकांनीं बहुत त्रास दिला. त्या समयीं तुमच्या संरक्षणार्थ मातुश्रींनीं ज्यास अंतपार नाहीं असें दुःख भोगिलें. तुमच्यासाठीं त्यांच्या हाडांचे मणी आणि रक्ताचें पाणी झालें. तुमच्या काळजीनें त्यांस एक दिवसही अन्नपाणी गोड लागलें नाहीं. तळहातावरच्या फोडासारखी तुमची त्यांनीं जतन केली. पारध्यांच्या भयानें जशी पक्ष्यांची आई एखाद्या उंच डोंगराच्या अवघड भेगळेंत घरटें बांधून तेथें आपलीं पिलें ठेविते आणि बाहेरून रोज दाणापाणी आणून त्यांच्या चोचींत घालते, मग तीं पिलें पंख फुटून तिच्या भोंवतीं बागडूं लागतात आणि चिंवचिंव करूं लागतात, तें पाहून तिच्या पोटांत आनंद मावेनासा होतो; तसें आईसाहेबांनीं शिवनेरी किल्ल्यावर तुमचें लालनपालन केलें, मोठ्या समारंभानें तुमचें उष्टावण केलें, आणि तुम्हांस कडेवर घेऊन चिटक्या वाजवाजवून जेवावयास शिकविलें.

भारतांत यक्ष आणि धर्मराज यांचीं प्रश्नोत्तरें आहेत. त्यांत आकाशापेक्षां उंच पिता आणि पृथ्वीपेक्षां थोर माता असें सांगितलें आहे. मातेपरतें दुसरें दैवत नाहीं. ह्याकरितां प्रत्यहीं आईसाहेबांचे आशीर्वाद घेऊन कामास लागावें. त्या वीरकन्या व वीरपत्नी आहेतच. आतां आपल्या कृतीनें वीरमाता ही त्यांस पदवी अर्पण करून त्यांचें उतराई व्हावें.

मी या तुमच्या जहागिरीचा कारभार पहायास लागून २५-३० वर्षें झालीं. त्या वेळची इकडच्या मावळे लोकांची स्थिति मनांत आली म्हणजे डोळे भरून येतात. बिचाऱ्यांना रहाण्यास घर नाहीं, खाण्यास अन्न नाहीं, पांघरण्यास वस्त्र नाहीं, नांगरण्यास बैल व औत नाहीं, आणि घरांत धातूचा स्पर्श नाहीं. असा त्यांच्यामध्यें एकसारखा नकाराचा नगारा वाजत होता. अठरा विश्वे दरिद्र त्यांच्या घरीं नांदत होतें. जमिनी ओसाड पडल्या होत्या. पोट भरून वर्षाचे कांठीं जमिनीच्या मालकाला पायली दोन पायली धान्य पोंचविण्याची सुद्धां त्यांस ऐपत नव्हती.

पूर्वीचे मुसलमान अधिकारी गांव इजाऱ्यानें देऊन टाकीत. मग इजारदार लोक हवे तसे त्यांस नागवीत, ह्यामुळें शेतकरी व रयत चरकांत पिळून काढल्यासारखी निःसत्व झाली होती. 'केळीवर नारळी आणि घर चंद्रमौळी' अशा प्रकारची त्यांची कंगाल स्थिति होती. पोटास नसल्यामुळें सर्व लोक जर्जर झाले होते. धान्याच्या ऐवजीं रानांत आपोआप उगवलेल्या रानभाजा, कंदमुळें, फळें खाऊन ते निर्वाह करीत. मध्यान्हकाळापेक्षां अंतकाळ बरा असें त्यांस झालें होतें. क्षुधेविषयीं एका कवीनें म्हटलें आहे कीं:—

'नास्ति क्षुधासमं दुःखं नास्ति रोगः क्षुधासमः ।
नास्त्याहारसमं सौख्यं, नास्ति क्रोधसमो रिपुः ॥'

म्हणजे क्षुधेसारखें दुःख नाहीं; क्षुधेसारखा रोग नाहीं, आहारासारखें सौख्य नाहीं, आणि क्रोधासारखा शत्रु नाहीं. सारांश निराहाराचें महद्दारुण दुःख त्या मावळ्यांच्या वांट्यास येऊन सरसालांत कांहीं दिवस ते नद्या, ओढे व दुसरे पाणवठे ह्यांच्या कांठीं कांहीं जातींचीं खुरटीं झाडें उगवतात त्यांचे पाले निसून, चिरून, त्यांत मिठाचा दाणा टाकून, उकडून, तसेच खात. कांहीं दिवस चवेणीचे गड्डे, आंबे, वगैरे पदार्थांनीं आपल्या पोटाची खांच भरीत. कांहीं दिवस जांबळें, करवंदें, गोधनें, आंवळे, चिंचा, कवठें, बोरें, हरपरेरवड्या व टेंबुर्णीचीं, वडाचीं किंवा निदान निवडुंगाचीं पिकलेलीं फळें खाऊन निर्वाह करीत. कांहीं दिवस अगस्ता व शेवगा ह्यांचीं फुलें शिजवून खात, आणि पोटाची आग शांत करीत. चिंचा व आंबे ह्यांच्या हंगामांत चिंचोके व कोया सांठवून ठेवीत, आणि ज्या दिवशीं कांहीं खावयास नसे त्या दिवशीं त्यांच्या पिठाच्या भाकरी करून पोटाची भर करीत. लहान मुलें भुकेनें व्याकुळ होऊन आयांचे लोंचके काढूं लागलीं म्हणजे त्या चिंचोक्यांची आंबील करून त्यांस पाजीत. आणि तीं तीं मिटक्या मारून खात!! ज्या पदार्थांची सणगर, साळी किंवा कोष्टी लोक खळ करितात तो तुरट, चिकट व बेचव

पदार्थ त्यांस त्या समयीं मिष्टान्नापेक्षांही अधिक रुचकर लागे ! ! क्षुधातुरांना कसची रुचि, आणि कसची चव ! ! प्राण अन्नमय आहे. तो अन्नसेवनाव्यतिरिक्त जगावयाचा नाहीं. गरीब, श्रीमंत, कोणी असो, पोटजाळ कोणाला सुटला नाहीं. त्या समयीं दुष्काळांत तेरावा महिना पडावा त्याप्रमाणें मावळांत लांडग्यांचा कहर उसळल्यामुळें तिकडची वस्ती उठून मुलूख उजाड होत चालला. ही त्यांची दीनावस्था तुमचे तीर्थरूप शहाजीराजे यांस मीं विनंतीपत्रानें विदित केली. आणखी असेंही कळविलें कीं, 'लोक अगदीं निस्त्राण झाले आहेत. सबब तूर्त त्यांचा गुजारा होण्यापुरता त्यांस कांहीं पैसा दिला पाहिजे. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांस ऐपत आल्यावर दिलेला पैसा ते हळूहळू फेडतील; परंतु अशी तजवीज या समयीं न करावी तर आपली जहागीर ठार बुडाल्यासारखी आहे.' असें कळल्याबरोबर त्यांनीं तिकडून पैशाची मदत केली. 'कौलकरार लिहून घेऊन कुळांस तगाई देऊन देशाची आबादानी करावी,' अशी त्यांची आज्ञा हातीं पडतांच त्या कामास लागलों. संन्याशाच्या लग्नास शेंडीपासून आरंभ, असें म्हणतात; तसें त्यांना प्रथम लंगोट्या-सुद्धां द्याव्या लागल्या. त्यांना पेरण्यासाठीं धान्य विकत घेऊन दिलें. शेतें नांगरण्यास बैल घेऊन दिले. आणि त्यांजकडून कबूल करून घेतलें कीं, अमुक वर्षेंपर्यंत जमिनीचें उत्पन्न आम्ही खाऊं, व पुढें सरकारास सालदरसाल अमुक धान्य देत जाऊं. असा बंदोबस्त केल्यावर पडजमिनीची लागण होत चालली. मावळांतल्या बरकंदाज व जमेदार लोकांकडून लांडग्यांचा नाश करविला. वाघ, अस्वल, असलीं जनावरें कोणीं मारून आणिल्यास त्यांस बक्षिसें दिलीं. ह्यामुळें प्रजापीडक जंगली श्वापदांचा उपद्रव कमी झाला. मावळांत व मुऱ्ह्यांत लोकवस्ती वाढत चालली. कांहीं वर्षें सरकारधारा माफ केल्यामुळें लोक आबाद होऊन त्यांचा दाणा शिल्लक पडूं लागला. पुढें कराराप्रमाणें ते जमिनीचा वसूलही देऊं लागले. असा तुमच्या वडिलांनीं

 9870

मावळयांचा पोटच्या पोराप्रमाणें प्रतिपाळ करविला. ते उपकार स्मरून आतां त्यांच्या बायका जात्यांवर त्यांच्या नांवानें गाणीं गातात आणि तेही डफतुणतुण्यांवर दररोज त्यांच्या नांवाचे पवाडे म्हणतात.

मावळ प्रांतांत त्या लोकांचा पुष्कळ भरणा आहे. त्यांना कधीं दिवाणदरबार माहीत नाहीं, यामुळें थोर लोकांची अदबी कशी ठेवावी, त्यांजपाशीं कसें बसावें, कसें बोलावें, कसें रहावें, आणि कसें चालावें, ह्या गोष्टींची त्यांस माहिती नाहीं. ते दिसण्यांत ओंगळ, अजागळ व जंगली दिसतात खरे, तरी त्यांच्यामध्यें एक गुण मोठा आहे. त्यांस धन्यानें सांगितलेलें काम ते इमानेंइतबारें करितात. त्यांचें शरीर कृश असलें तरी ते हाडाचे मजबूत आहेत. डोंगरांतल्या गुप्त पाउलवाटा त्यांस चांगल्या माहीत आहेत. कांहीं ठिकाणीं कडे असे तुटलेले आहेत कीं, तेथून जरा पाऊल चुकलें कीं, तळापर्यंत घरंघळत जाऊन चुराडाच व्हावयाचा, किंवा कड्यांवरून नजर खालीं फेंकिली असतां भोंवळच यावयाची. अशा बिकट जाग्यांतूनही ते वानरांसारख्या टणाटण उड्या मारीत माथ्यावर चढून जातात. चौकीपहाऱ्याचीं कामें ते फार उत्तम रीतीनें बजावितात. त्यांच्या पहाऱ्यांतून कधीं सुतळीचा तोडा जावयाचा नाहीं, असे ते फार विश्वासूक व सावध असतात. तीर, तरवार व बंदुक, या कामांतही ते अत्यंत प्रवीण आहेत. आणखी त्यांना मिजास कशी ती ठाऊक नाहीं. राहण्यास गवती खोंपट, आंगभर मोटेंधोटें वस्त्र व पोटास कांदाभाकर, इतकी सामग्री असली म्हणजे तींतच ते तृप्त असतात. धन्याची कितीही दौलत त्यांच्या ताब्यांत असली तरी एका तनसडीचीही गफलत त्यांजकडून व्हावयाची नाहीं. धनी बक्षिसादाखल आपल्या हातानें जेवढें त्यांस उचलून देईल तेवढेंच ते घेतील आणि कृतोपकाराचें स्मरण ठेवून आपल्या धन्याच्या जिवासाठीं प्रसंगोपात्त ते प्राणही देतील, अशी त्यांची

नेकनामी आहे. फार काय सांगावें, ते आपल्या धन्यास देवाप्रमणें लेखतात.

आतां चाकरानें धन्याची सेवा कशी करावी व त्याचें वर्तन कसें असावें ह्या बाबतींत दोन शब्द बोलतों. ते सेवक आणि स्वामी या दोघांनींही लक्षांत ठेवावे. सेवकांनीं एकमेकांचा हेवा व द्वेष न करितां सलुख्यानें रहावें. कांहीं सेवक प्रथम प्रथम मेहनती, नम्र व निस्पृह असतात. पण त्यांस अधिकाराचीं व विश्वासाचीं कामें दिलीं म्हणजे ते लागलेच आळशी, गर्विष्ठ व द्रव्यलोभी होतात. तर असें होणें बरें नाहीं. चारचौघांत शोभेल असेंच वर्तन ठेवा. धन्याच्या पैशाची तसनस होऊं न देतां त्याचा जेणेंकरून संतोष राहील असें वागा. सुस्त व अनन्वित कृत्यें करणारे यांचा कैवार घेऊं नका. तुमचें आचरण शुद्ध आहे कीं अशुद्ध आहे, व तुम्ही कसे वागत असतां याजकडे सर्व लोकांचा डोळा असतो. तुमचें उणें काढण्यासाठीं ते डोळ्यांत तेल घालून टपलेले असतात, इन्साफाच्या कामांत खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें करण्याचा प्रयत्न करूं नका. अधिकाराच्या धुंदींत अनाथ व निरपराध मनुष्यांस पीडा देऊं नका. तुमचे धनी आबासाहेब, यांच्या पूर्वजांनीं जीं जीं पराक्रमाचीं कृत्यें केलीं तीं तीं त्यांस विदित आहेत. तेव्हां ते आपला राजमार्ग सोडून आपले सद्वंशास कलंक लागण्यासारखें कृत्य करणार नाहींत. तुम्हीही इमानेंइतबारें व मेहनतीनें चाकरी करून त्यांची कृपा संपादन करा.

चाकरानें आपल्या धन्याची एकनिष्ठ सेवा करावी ती अशीः—त्याचीं आज्ञापत्रें येतील तीं शिरसा मान्य करावीं. जींत त्याचें अहित असेल ती गोष्ट त्याजपासून गुप्त ठेवूं नये. त्याला जें कळलें नाहीं तें आपण संभाळावें. खराखरा मजकूर असेल तोच त्यास निवेदन करावा. त्यानें सोंपविलेला अधिकार प्राणाच्याही पलीकडे जतन करावा. गैरमाहितीचा मजकूर त्यास श्रुत करूं नये किंवा त्याची पोकळ खुषामत करण्यांत वेळ

घालवूं नये. त्याच्या आज्ञेचें उल्लंघन करूं नये. जमाखर्चांत चुक्या राहूं न देतां हिशेब चोख ठेवाचे. परराज्यांतील गुप्त लाभाचा स्वीकार करूं नये. अंतस्थ प्राप्ति असेल ती धन्यास दाखवून जमाखर्चांचा त्यास बरोबर मोजबा द्यावा. तफावतीचें काम करूं नये. स्वसंतोषानें धनी बक्षिस उचलून देईल तें संतोषवृत्तीनें ग्रहण करावें. कारणपरत्वें त्याचा कोप झाला असतां सोसून घ्यावा. चांगल्या गुणांनीं त्यास वश करून हमेषा त्याचा उत्कर्ष इच्छीत जावा. तो ज्या ज्या पद्धती व नियम बांधून देईल त्यांप्रमाणें वर्तून सर्वांनीं एकचित्तानें असावें. कागदपत्र संशययुक्त लिहूं नयेत; व संशययुक्त भाषणही करूं नये. अश्वशिक्षेप्रमाणें स्वपुत्रांस तरबेज करून धन्याची एकनिष्ठ सेवा करण्याचे मार्ग त्यांस दाखवून द्यावे. धन्याचें भांडवल, पत व गुह्य गोष्ट, हीं जिवापलीकडे जतन करावीं. १ अन्नछत्रें घालून अनाथांचें संरक्षण करणारा, २ परमार्थाकडे लक्ष ठेऊन सात्त्विक बुद्धीनें प्रपंच करणारा, ३ परोपकारार्थ तळीं, विहिरी व धर्मशाळा बांधणारा, आणि ४ एकनिष्ठ सेवक, हे चार पुरुष परमेश्वरास बहुत आवडतात.

धन्यासाठीं मिळविलें किती आणि खर्च केला किती हें पहात जावें. आपला स्वभाव बरा किंवा वाईट ह्याचा आपले ठिकाणींच विचार करून शहाणपणाच्या घमेंडींत त्याचा उपमर्द करूं नये; लोकापवादाचें भय बाळगावें. धन्याशीं खरेंखरें व न्यायनिष्ठुर भाषण करावें. परोत्कर्षाचा संतोष मानावा. जाबसाली कामांत तरबेज असावें. एखादें अवघड काम करीनच असें एकाएकीं बोलूं नये. तें न बोलतां करून दाखवावें. आणि एकदां करीन असें वदल्यावर तें काम प्राण गेला तरी शेवटास नेल्याशिवाय राहूं नये. 'नीचो वदति न कुरुते, वदति न साधुः करोत्येव.' म्हणजे बोलावें मात्र आणि करूं नये हा गौण पक्ष, आणि न बोलतां करून दाखविणें हा श्रेष्ठ पक्ष होय. आतां, शंकराचार्यांनीं प्रश्नोत्तररत्नमालिकेंत प्रापंचिक जनांस कांहीं सद्बोध केला आहे, त्यांतील कांहीं गोष्टी तुम्हांस सांगतों. त्या नीट लक्षांत ठेवाव्या.—

| प्रश्न. | उत्तर. |
|---|---|
| १ पातुं कर्णांजलिभिः किममृतमिव युज्यते ? | १ सदुपदेशः. |
| ( कर्णरूप ओंजळीनें अमृतासारखें कशाचें प्राशन करावें? ) | ( सदुपदेशाचें. ) |
| २ को गुरुः ? | २ अधिगततत्वः सत्वहिताय उद्यतः सततं. |
| ( गुरु कोण ? ) | ( ज्यास तत्वज्ञान अवगत आहे, आणि सर्व प्राण्यांच्या हितासाठीं जो सतत उद्योग करितो तो. ) |
| ३ किं मोक्षतरोर्बीजं ? | ३ सम्यग्ज्ञानं क्रियासहितं. |
| ( मोक्षवृक्षाचें बीज कोणतें ? ) | ( क्रियेसहित उत्तम ज्ञान. ) |
| ४ कः पंडितः ? | ४ विवेकी. |
| ( पंडित कोण ? ) | ( विचारवान् पुरुष. ) |
| ५ किं मनुजेष्विष्टतमं ? | ५ स्वपरहितायोद्यतं जन्म. |
| ( मनुष्यांस अति इष्ट काय असावें ? ) | ( आपल्या आणि दुसऱ्याच्या हितार्थ जन्माचें सार्थक्य करणें. ) |
| ६ कः शूरः ? | ६ यो ललनालोचनबाणैर्न हि व्यथितः. |
| ( शूर कोण ? ) | ( जो स्त्रियांच्या नेत्रबाणांनीं व्यथा पावत नाहीं तो. ) |
| ७ किं दुःखं ? | ७ असंतोषः. |
| ( दुःख कोणतें ? ) | ( असंतोष हेंच दुःख. ) |
| ८ किं लाघवं ? | ८ अधमतो याच्ञा. |
| ( लघुत्व कोणतें ? ) | ( अधमापुढें हात पसरणें. ) |
| ९ को जागर्ति ? | ९ विवेकी. |
| ( जागा कोण ? ) | ( विचारवान्. ) |

| प्रश्न. | उत्तर. |
| --- | --- |
| १० का निद्रा ? किं मरणं ? | १० मूढता जंतोः. |
| ( झोंप कोणती ? मरण कोणतें?) | ( लोकांचा मूर्खपणा हीच निद्रा व हेंच मरण. ) |
| ११ नलिनीदलगतजलवत् तरलं किं ? | ११ यौवनं धनं चायुः. |
| ( कमलावरच्या जलाप्रमाणें चंचल काय ? ) | ( तारुण्य, धन व आयुष्य. ) |
| १२ को नरकः ? | १२ परवशता. |
| ( नरक कोणता ? ) | ( परतंत्रता. ) |
| १३ आमरणात् किं शल्यं ? | १३ प्रच्छन्नं यत्कृतं पापं. |
| ( जन्मभर बाणाच्या अणकुचीसारखें काय सलतें ? ) | ( झांकून ठेवलेलें पाप. ) |
| १४ कुत्र विधेयो यत्नः ? | १४ विद्याभ्यासे. |
| ( यत्न कोठें करावा ? ) | ( विद्याभ्यासाविषयीं. ) |
| १५ अवधारणा क्व कार्या ? | १५ खलपरयोषित्परधनेषु. |
| ( दुर्लक्ष कोठें करावें ? ) | ( दुष्ट, परस्त्री आणि परद्रव्य यांचे ठायीं. ) |
| १६ काहर्निशमनुचिंत्या ? | १६ सारसारता. |
| ( रात्रंदिवस मनन कशाचें करावें ? ) | ( सार कशांत व असार कशांत ह्यांचें. ) |
| १७ कस्मै नमः सुरेशैः ? | १७ सुतरां दयाप्रधानाय. |
| ( देवांसही वंद्य कोण ? ) | ( अत्यंत दयावान् पुरुष. ) |
| १८ कस्य वशः प्राणिगणः ? | १८ सत्यप्रियभाषिणो विनीतस्य. |
| ( लोक कोणांला वश असतात ? ) | ( खरें, प्रिय आणि नम्र असें भाषण करणारास. ) |
| १९ क्व स्थातव्यं ? कुत्र विधेयो वासः ? | १९ न्याय्ये पथि दृष्टादृष्टार्थलाभाय, सज्जननिकटे. |

| प्रश्न. | उत्तर. |
|---|---|
| ( वास कोठें करावा ? ) | ( दृष्टादृष्ट लाभासाठीं न्यायाच्या मार्गांत व सज्जनाच्या समीप. ) |
| २० को बधिरः ? | २० यो न शृणोति हितानि. |
| ( बहिरा कोण ? ) | ( जो हिताच्या गोष्टी ऐकत नाहीं, तो. ) |
| २१ को मूकः ? | २१ यः काले प्रियाणि वक्तुं न जानाति. |
| ( मुका कोण ? ) | ( ज्याला समयीं प्रिय भाषण करण्याचें समजत नाहीं, तो. ) |
| २२ किं मित्रं ? | २२ यो निवारयति पापात्. |
| ( मित्र कोण ? ) | ( जो पापकर्मापासून निवृत्त करितो, तो. ) |
| २३ कोऽलंकारः ? | २३ सुशीलं. |
| ( अलंकार कोणता ? ) | ( सुस्वभाव. ) |
| २४ किं वाचां मंडनं ? | २४ सत्यं. |
| ( वाणीचें भूषण कोणतें ? ) | ( सत्यभाषण. ) |
| २५ किं शोच्यं ? | २५ कार्पण्यं सति विभवे. |
| ( शोचनीय गोष्ट कोणती ? ) | ( वैभव असून कृपणता. ) |
| २६ कः कुलकमलदिनेशः ? | २६ सति गुणविभवेऽपि यो नम्रः. |
| ( कुलकमलाचा सूर्य कोणता ? ) | ( गुणवान् असून जो नम्र, तो. ) |
| २७ कस्मै स्पृहयति कमला ? | २७ निरलसचित्ताय नीतिवृत्ताय. |
| ( लक्ष्मी कोणाची इच्छा करिते ? ) | ( आळस नसून जो नीतीनें चालतो त्याची. ) |
| २८ के खलु नयनविहीनाः ? | २८ परलोकं ये न पश्यंति. |
| ( निश्चयेंकरून आंधळे कोण ? ) | ( परलोकाचा जे विचार करीत नाहींत, ते. ) |
| २९ का च सभा परिहार्या ? | २९ हीना या वृद्धसचिवेन. |

| प्रश्न. | उत्तर. |
| --- | --- |
| ( कोणच्या सभेंत जाऊं नये ? ) | ( ज्या सभेंत वयोवृद्ध मंत्री नाहीं, तेथें. ) |
| ३० प्राणादपि को रक्ष्यः ? ( प्राणाच्याही पलीकडे कोणाचें रक्षण करावें ? ) | ३० कुलधर्मः साधुसंगश्च. (कुलधर्म व साधुसंग, ह्यांचें. ) |

आबासाहेब, हीं आचार्यांचीं उपदेशपर वाक्यें लक्षांत ठेवा. तीं या कानानें ऐकिलीं आणि त्या कानानें सोडून दिलीं असें मात्र करूं नका.

आतां माझ्या स्वतःविषयीं शेवटचे दोन शब्द बोलून आटपतों. "मी तुमच्या वडिलांचा कदीम नौकर आहें. शहाजी महाराजांचा मजवर फार लोभ होता. आजपर्यंत मीं त्यांची यथामति सेवा केली. जहागिरीचें व तुमचें संरक्षण केलें. ह्या गोष्टींचें स्मरण ठेऊन माझ्यामागें माझ्या निराश्रित कुटुंबाचें पोषण करणें तुम्हांकडे आहे. ( डोळ्यांस पाणी आणून ) आतां मी त्यांचा कोणी नाहीं, आणि ते माझे कोणी नाहींत. माझीं मुलेंबाळें वगैरे सर्व परिवार तुमच्या ओटींत घालतों. शहाजी महाराजांस माझे शेवटचे मुजरे कळवा."

इतकें बोलून दादा थांबले. येथें दादांचें हें बोधपर भाषण संपलें. ह्या सद्बोधरूप सूर्यनारायणाचा महाराजांच्या हृदयाकाशभुवनांत उदय होतांच तेथील अज्ञानतिमिराचा नाश होऊन त्यांचें सर्व अंतःकरण प्रकाशमय होऊन गेलें, तें भाषण ऐकून वरकड श्रोत्यांचींही मनें आनंदभरित झालीं. सत्य आहे. शार्ङ्गधरांत सत्समागमाची फलश्रुति लिहिली आहे कीं:—

दूरीकरोति कुमतिं विमलीकरोति
चेतश्चिरंतनमघं चुलकीकरोति ॥
भूतेषु किं च करुणां बहुलीकरोति
संगः सतां किमु न मंगलमातनोति ॥ १ ॥

असो. आतां या नीतिमान् पुरुषाची थोडीशी चटकदार हकीकत पुढच्या भागांत देऊं.

## भाग ३.

### दादांचें संकलित इतिवृत्त.

जब तुम पैदा भये, जग हासे तुम रोय।
अब तोभी ऐसा करो, के पीछे हासे ना कोय॥

तुळशीदास.

दादोजी कोंडदेवांचें अंतःकरण मोठें धर्मशील, स्वदेशभक्तिपरायण, भक्तिमान्, सरळ, पापभीरु, रसिक आणि चातुर्यानें परिपूर्ण होतें, व दुसऱ्याच्या ऐहिक व पारलौकिक सुखाकरितां त्यांस खरी काळजी असे. त्यांच्या भाषणाची अशी कांहीं शैली असे कीं, अगदीं अडाणी मनुष्यास देखील त्यापासून सुबोध होईल, मग शिवाजी महाराजांसारख्या धूर्त व तैलबुद्धि पुरुषाच्या अंतःकरणांत त्यांच्या सहवासानें ज्ञानाचा प्रकाश पडला तर नवल काय? असा पुरुष विरळा; म्हणूनच एका सहृदय कवीनें म्हटलें आहे कीं:—

किं मधुना किं विधुना
किं सुधया किं च वसुधयाऽखिलया॥
यदि हृदयहारिचरितः
पुरुषः पुनरेति नयनयोरयनम्॥ १॥

अर्थः—ज्याच्या चरित्रानें जनचित्तरंजन होतें अशा थोर पुरुषांचें दर्शन घडलें असतां त्यापुढें मधु, चंद्र, अमृत किंबहुना संपूर्ण पृथ्वी हीं सर्व तुच्छ आहेत; असो.

दादांची प्रकृति अगोदरच वृद्धापकाळामुळें क्षीण झाली होती; तशांत बोलण्याच्या श्रमानें त्यांस एकाएकीं घेरी येऊन त्यांनीं आपल्या मुलाच्या आंगावर मान टाकिली. कांहीं वेळानें मूर्च्छा कमी होऊन जरा स्मृतीवर येऊन 'अरे, माझी मान थोडी उचलून धरारे' इतकेंच ते बोलले. पुढें हालचाल बंद पडत चालली. निर्याणकालाचीं चिन्हें दिसूं लागलीं, आंग पायांकडून कालासारखें थंड पडत चाललें. तीच सर्दी हळूहळू वर चढत चालली. शब्द आंत आंत ओढत चालला. जीभ वांकडी पडली. तरी त्यांची स-

रणशक्ति कायम होती. पुढें 'अंतकाले च मामेव स्मरन् मुक्त्वा कलेवरं' हें गीतावाक्य त्यांच्या मुखांतून निघालें, आणी लागलाच शरिरांतून प्राणवायुही निघून गेला. याप्रमाणें दादांचें प्राणोत्क्रमण झालें. त्या समयीं त्यांची पत्नी जवळच उभी होती. भर्त्यांची मृतस्थिति पाहून तिचा तत्क्षणींच सहगमनाचा निश्चय झाला; परंतु त्या साध्वीचें सहगमन वरकड सत्यांच्या सहगमनाहून अगदीं भिन्न होतें. पति प्रेतंगत होतांच तिला मस्तकावर ब्रह्मांड कोसळल्यासारखें झालें. तिच्या हृदयाला हजारों काळविंगळ्या डसल्यासारख्या वेदना झाल्या. तिचें काळीज तापलेल्या सांडसानें ओढल्याप्रमाणें विव्हळ झालें. तिच्या पोटांत दारूला अकस्मात् बत्ती दिल्याप्रमाणें दुःखाग्नीचा भडका झाला. प्रस्तुतचें पतिदर्शनसुख आणि पुढचें पतिविरहदुःख, तसेंच विद्यमान वज्रचूडेमंडित सौभाग्य, आणि भावी परम दुःसह वैधव्य, हीं तिच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभीं राहिलीं, आणि देहभान विसरून जाऊन, ती अकस्मात् खालीं जमिनीवर धाड्दिशीं पडली; आणि जी पडली ती काष्ठ होऊनच पडली. पुन्हां हूं कीं चूं कांहींएक नाहीं. ह्याप्रमाणें तिच्या कुडींतून जगज्योति निघून जाऊन पतीच्या अंताबरोबर तिचाही अंत झाला !

हें दंपत्य एकदम मृत्यु पावल्याचें पाहून जवळ असलेली मंडळी बहुत आश्चर्यभरित व दुःखी कष्टी झाली. त्यांच्या मरणाची गांवांत बातमी पसरतांच आश्रित, सुखवस्तु, वाणी-उदमी वगैरे सुमारें दोनशें लोक आपापले धंदे सोडून व दुकानें बंद करून जिजाबाईसाहेबांच्या वाड्यांत घाईघाईनें आले. आज आपले मायबापच नाहींतसे झाले असें सर्वांस वाटलें. त्या उभयतांनीं केलेले उपकार, त्यांचा चांगुलपणा व ते बोललेले मायेचे शब्द, हें सगळें मनांत एकदम उभें राहून सर्व लोक खळखळां रडूं लागले. दादांच्या बायकोचें मुळचें नांव लक्ष्मीबाई होतें. आणि खरोखरच त्या नांवाप्रमाणें ती घरचीच केवळ नव्हे, पण सगळ्या पुण्याची भरली लक्ष्मी होती. ती मोठी सुशील व सदाचारसंपन्न

स्त्री होती. एका कवीनें म्हटलें आहे कीं, 'संपन्न रमणी शीलसंपन्नरमणीं विना,' ( शीलसंपन्नरमणीं विना संपत् न रमणी. ) म्हणजे संपत्ति कितीही असली तरी शीलसंपन्न रमणी ( स्त्री )- वांचून ती रमणी ( शोभादायक ) नाहीं. वास्तविक आहे.

अशा साध्वी स्त्रीशीं संयोग झाल्यानें दादांस आपल्या गृहस्थाश्रमाची नेहमीं धन्यता वाटे. असो. त्या माउलीच्या स्वाभाविक मायाळू स्वभावावरूनच लोक तिला माई माई असें म्हणत. ह्यामुळें तिचें मुळचें खरें नांव पुष्कळांस माहीतही नव्हतें. त्या माईचे मायेचे शब्द त्यांच्या कानांला अमृतासारखे गोड लागत. त्यांचें स्मरण होऊन त्यांत त्यांचीं मनें मग्न झालीं. आणि त्यांचीं पंचकर्मेंद्रियें अंतर्मुख होऊन आपल्या शेजारीं कोण बसलें आहे हें त्यांस दिसेना, कीं, कोण काय बोलतें हें त्यांस ऐकूं येईना, अशी त्यांची क्षणभर भ्रांतिष्टासारखी अवस्था झाली. शोकज्वरानें सर्व लोक घुमूं लागले. ह्यावरून इष्टजनाचें मरण किती दुःसह आहे पहा! दुःखानें त्यांचे ऊर भरून आले आहेत. मध्यभागीं दादा व त्यांची पत्नी यांचीं प्रेतें पडलीं आहेत. अहो बाबा! अग आई! असा त्यांचे सभोंवतीं त्यांचीं मुलें आक्रोश करीत आहेत! त्यांचा थोरला मुलगा भुईवर दणादण डोकें आपटून घेत आहे! धाकटीं मुलें बाबा, बोलाहो एकदां! आई, बोल ग एकदां! असें विलाप करकरून भुईवर गडबडां लोळण घेत आहेत! तो हृदयद्रावक देखावा पाहून 'शिव शिव, हर हर,' असें लोक म्हणत आहेत! कोणी मोठ्यानें हंबरडा फोडून ओकसाबोकशीं रडत आहेत! कोणी स्फुंदत आहेत! कोणी पाय पोटाळून व गुढघ्यांत माना घालून बसले आहेत! कोणाच्या डोळ्यांतून खळखळां अश्रुधारा चालल्या आहेत! कोणाचे कंठ दाटून आले आहेत! व कोणी स्मशानवैराग्याच्या गोष्टी सांगत आहेत! अशी त्या समयीं त्या लालमहालांत एकच धांदल उडून गेली. करुणारसानें त्या प्रसंगीं व त्या स्थळीं आपलें खरें खरें स्वरूप होतें तें प्रकट केलें, आणि त्यानें आपल्या कसबाची

पराकाष्ठा करून सोडिली असें म्हटलें पाहिजे. अशा दुःखाच्या प्रसंगाचें हुबेहुब चित्र पाहून अगदीं पाषाणहृदय मनुष्य असेल त्यासही दयेचा पाझर सुटल्याविना राहणार नाहीं.

जसा एखादा जुनाट इरसाल आम्रवृक्ष असतो व त्यावर अमृतवल्ली ( गुळवेल ) गुरफटलेली असते. पुढें वार्धक्यदशेंत त्या वृक्षाच्या सर्व मुळया सुटून एकाच मुळीवर तो जीव धरून उभा असतो. त्यानें आपल्या हयातींत लोकांस आपली गार छाया, पानें, आंबे, मोहोर, लांकडें, इत्यादिकेंकरून सुख दिलेलें असतें. तसेंच त्याच्या आश्रयानें वाढलेल्या गुळवेलीनेंही ज्वरी लोकांचे ताप वरे केलेले असतात. पुढें तो एवढा उपयोगीं पडलेला जरठ वृक्ष एखादे दिवशीं वाऱ्याच्या लहानशा झपाट्यानें एकाएकीं जमीनदोस्त होतो आणि त्याच्याबरोबर त्याच्या साहचर्यानें राहिलेली व वाढलेली जी अमृतवल्ली तीही नाहींशी होते. मग त्यांनीं केलेले उपकार स्मरून लोक दुःखी कष्टी होतात. तद्वत् दादा व माई ह्यांची ती प्रेतंगत स्थिति पाहून व त्यांचा औपकारिक स्वभाव आठवून लोकांचीं अंतःकरणें फारच उद्विग्न झालीं.

असो. ह्याप्रमाणें जो तो आपल्या ठिकाणीं स्तब्ध झाला आहे; पुढच्या त्यांच्या दहनविधीच्या तजविजीस कोणी लागत नाहीं; असें पाहून जिजाबाईसाहेबांनीं सर्वांचें शांतवन करून मुळामुठानदीच्या संगमावर त्या दंपत्याचें दहन करविलें. बरोबर गांवचा विप्रसमुदाय व इतर कुळंबी, माळी, तेली, तांबोळी वगैरे सुमारें ४०० मनुष्यें स्मशानापर्यंत पोहोंचविण्यास गेलीं होतीं. चितेस अग्नि देतांना स्मशानयात्रेस गेलेल्या सर्व लोकांचे कंठ दाटून आले, आणि 'दादा, तुम्ही गेलां ते गेलां, पण आमच्या मातुश्रीसही बरोबर घेऊन चाललां ! इतके आम्हांवर निर्दय कां झालां !!' असा तेथें एकदम दुःखाचा ध्वनि निघाला.

दादांचें वय मरणसमयीं कमकसर ७० वर्षांचें होतें. ते मुळचे मौजे मळठण तालुके पाटस जिल्हा पुणें येथील राहणारे व त्याच

गांवचे वतनदार कुळकर्णी होते. पण कुटुंबवत्सल, उत्पन्न प्रपंचास पुरेना, म्हणून, शिवाजी महाराजांचे बाप शहाजीराजे, दौलताबादच्या राज्याचा कारभार पहात होते, त्यांजकडे ते चाकरीस जाऊन राहिले. त्यांचे गुण पाहून शहाजीराजांचाही त्यांजवर बहुत लोभ बसला. ते पुण्यास राहून शहाजीराजांच्या जहांगिरीचा[1] कारभार पाहात होते. त्या वेळच्या त्यांच्या न्यायीपणाच्या कांहीं गोष्टी तुकारामचरित्रांत महीपतिबावांनीं व दुसऱ्या कित्येक बखरींत लिहिलेल्या आहेत. त्या मोठ्या चित्तवेधक आहेत. त्यांतून मासल्याकरितां एक दोन गोष्टींचा सारांश येथें देतों.

दादोजी कोंडदेव खोट्याचे व अन्यायाचे मोठे द्वेष्टे होते. त्यांच्या हातून नकळत एकदां एक अन्याय घडला. तो त्यांच्या बायकोनें त्यांना सहज विनोदानें दाखवून दिला. तेव्हां ज्या हातानें अन्याय घडला तो हातच कलम करण्याचें त्यांनीं मनांत आणिलें. त्या समयीं जवळ एक पंडित होता, तो म्हणाला, 'अज्ञात पापाला एवढ्या मोठ्या प्रायश्चित्ताचें कारण नाहीं. याला इतकेंच करावें कीं, ज्या हातानें अन्याय घडला त्या हाताची बाही लांडी ठेवावी.' हें ऐकून त्यांनीं आमरण आपल्या आंगरख्याची एक बाही थोंटी ठेविली होती.

पुण्यापासून थोड्या अंतरावर लोहगांव म्हणून एक गांव आहे. तेथें देहूकर प्रसिद्ध साधु तुकारामबोवा यांचें एकदां कीर्तन झालें. तें कीर्तन श्रवण करण्यास, इतर मंडळीबरोबर दोन संन्याशी गेले होते. कीर्तनांत तुकारामबोवांनीं नाममहिमा सांगितला. स्वामींनीं शिखासूत्राचा त्याग केला होता, पण ज्ञानगर्व, दुरभिमान व मत्सरबुद्धि, हीं त्यांनीं आपल्यापासून दूर केलीं नव्हतीं, यामुळें ते खऱ्या वैराग्यापासून दूर होते. ज्ञानेश्वरांनीं म्हटलेंच आहे कीं,

---

१. कृष्णाजी अनंत सभासदकृत बखरींत लिहिलें आहे कीं, त्या वेळेस पुणें व सुपें मिळून ४० हजार होन वसुलाचा महाल शहाजीराजांकडे जहागीर होता.

संन्याशाचें सोंग संपादिलें सांग
वैराग्याचें अंग आणितां न ये ॥ १ ॥

खरें पाहूं गेलें असतां तुकारामबोवांची वाणी वेदश्रुतीची देखील बरोबरी करणारी. पण ती वाणी वाण्याच्या मुखांतून निघालेली, याच कारणामुळें स्वामींच्या अंगाचा तिळपापड झाला. कीर्तन चालत असतां मध्येंच ते रागानें उठले, आणि देशाधिकारी दादोजी कोंडदेव यांजकडे लागलेच फिर्याद सांगायास गेले. ते दादांस म्हणाले, 'तुक्या जातीचा वाणी असून त्यानें नामस्मरणाचें चोहींकडे खूळ माजविलें आहे. यामुळें कर्ममार्ग सोडून लोक भक्तिमार्गास लागत चालले. हें वर्णाश्रमधर्म बुडविण्याचें दुश्चिन्ह आहे. सर्व वर्णांचे गुरु ब्राह्मण, असें असतां त्यांनाही त्यानें आपणास साष्टांग नमस्कार घालावयास लाविलें. आतां वर्णसंकराची वेळ जवळ येऊन ठेपली. तुम्ही देशाधिकारी, जातीचे ब्राह्मण आणि न्यायी आहां, म्हणून तुम्हांकडे हें गाऱ्हाणें सांगायास आलों आहों. तर तुक्याचा लवकर बंदोबस्त करावा.' दादा म्हणाले, 'आपलें म्हणणें ऐकिलें, पण तुकारामबोवांचें म्हणणें काय आहे तें ऐकिल्याखेरीज निर्णय करतां येत नाहीं. यासाठीं त्यांना येथें बोलवितों. मग त्यांची व आपली माझ्यासमक्ष भेट झाल्यावर ज्याचा पक्ष खोटा ठरेल त्याला शिक्षा देईन.' मग लोहगांवचे ब्राह्मण वगैरे समस्त गांवकरी व तुकारामबोवा यांस त्यांनीं पुण्यास बोलावूं पाठविलें. ताकीदपत्र पाहातांच सर्व मंडळीसह, श्रीविठ्ठलाचें भजन करीत करीत, तुकारामबोवा पुण्यास संगमावर येऊन उतरले, तेथें दादांची भेट होऊन ते तुकारामबोवांस पुण्यांत घेऊन आले. त्यांनीं स्वामींना सांगितलें कीं, 'तुकारामबोवांची आज भेट करवितों, त्यांत जो हटेल त्याला कडक शिक्षा देईन.' तुकारामबोवा त्याच रात्रीं कीर्तनास उभे राहिले. श्रोत्यांची अतिशय दाटी झाली. त्या वेळेसही तुकारामबोवांनीं हरिनामाचाच महिमा वर्णन केला. त्यांत त्यांनीं प्रेमरसाच्या केवळ धारा सोडिल्या. तुकारामबोवांचे तोंडचे—

गोविंदावांचोनी वदे ज्याची वाणी ॥
हगवण घाणी पिटपिट ते ॥ १ ॥
तुजवीण वाणूं आणिकाची थोरी ॥
तरी माझी हरी जिव्हा झडो ॥ २ ॥
सुख वाटे तुझे वर्णितां पवाडे ॥
प्रेममीठी पडे वदनासी ॥ ३ ॥
तरावया एक युक्ती हेचि असे ॥
तुका नामनावेमधीं बैसे ॥ ४ ॥

असे अनेक प्रेमळ अभंग ऐकून भाविक श्रोत्यांचे गळे तर सद्गदित झालेच, पण जे पाखांडी आणि धादांती होते त्यांच्याही डोळ्यांस धादांत पाणी आलें. त्या प्रेमानंदभरांत सर्व लोक भराभर उठून तुकारामबोवांच्या पायांवर लोटांगणें घालूं लागले. इकडे तुकारामबोवांचा द्वेष करणारे स्वामी होते, त्यांसही अनुताप होऊन त्यांनींही सर्वांच्या देखत त्यांस साष्टांग नमस्कार घातले. आणि ते दादोजी कोंडदेवांस म्हणाले कीं, 'आम्ही अपराधी आहों, आणि तुम्ही देशाधिकारी आहां, या समयीं जो राजदंड कराल तो आम्हांस मान्य आहे.' असें म्हणतांच त्यांस तीव्र शासन करण्यास दादा सिद्ध झाले. न्यायाचे कामांत ते कोणाचीही भीड मुरवत धरीत नसत. शेवटीं तुकारामबोवांच्या मध्यस्थीनेंच तो स्वामींवर आलेला दुर्धर प्रसंग टळला. ते म्हणाले, 'स्वामींनीं जो आश्रम धारण केला आहे, त्या आश्रमाची विडंबना परमेश्वरास प्रिय होणार नाहीं. आणि त्याला जी गोष्ट अप्रिय ती आपण कधींही करूं नये.' आणखी

"दया क्षमा शांती ॥ येथें देवाची वसती ॥ १ ॥
असों द्यावा धीर सदा समाधान ॥
तेणें नारायण जवळी केला ॥ २ ॥"

अशा बोधाच्या गोष्टी सांगून त्यांनीं स्वामींची मुक्तता करविली.

येथें दादोजी कोंडदेव ह्यांनीं केलेल्या एका निवाड्याची असल बरहुकूम नक्कल[१] देतों. तिजवरूनही दादांचा न्यायीपणा कसा

१. ही नक्कल रावबहादूर गोपाळराव हरी देशमुख यांच्याकडून मिळाली.

होता हें स्पष्ट दिसून येतें. त्यांनीं केलेल्या न्यायांचे आणखीही कांहीं मासले पुण्यास कित्येकांच्या संग्रहीं असल्याची माहिती मिळते. पण ते समयास आम्हांस मिळाले नाहींत त्यास इलाज नाहीं. तथापि, 'एका शितावरून भाताची चांचणी' या न्यायानें खालीं दाखल केलेल्या एकाच निवाड्यावरून जिज्ञासु वाचकांची जिज्ञासा थोडीशी तरी तृप्त होईल.

## असल बरहुकम नकल.

"श्री.

महजूर बहुजूर कसबे पुणें हाजी रमजान ता० छ० ७ मोहरम.

रा० दादोजी कोंडदेव सुभेदार ठाणें मजकूर.

**शिक्का.**

रंजितराय दप्तरदार ठाणें मजकूर.

**शिक्का.**

काजी अबदुल्ला हकीमसरा व काजी इब्राम नवे काजी.

**शिक्का.**

शिदोजी नाईक व महिपत नाईक नाईकवाडी कोट ठाणें मजकूर.

**शिक्का.**

मालोजी नरसिंगराव व विठोजी सितोळे देसाई प्र० मजकूर.

**शिक्का.**

मोरो तानदेव देशपांडे प्र० मजकूर.

**शिक्का.**

चिंतो पाटल्र नि० मुंजेरीमाळी मेहेत्रे क० मजकूर.

गणशेट शेटिया मोहोतर्फा आत शेटिया मोहोतर्फा.

सू० तिस्सा सल्लासैन अलफ बेशमी कृष्णाजी रंगनाथ धडफळे अजहती प्र० मजकूर यांहीं जाहिर केलें जे, कसबे मजकुरीं आपले वाड्यावर दिवाणांचे ठाण्याची जागा म्हणोन देशपांडे ह्यांचे म्हटल्यावरून राजश्री दादाजीपंत, श्रीमंत राजश्री शहाजी राजे यांजकडे परगण्याचा अंमल झाला सबब, कसबे मजकुरीं ठाणें आपले जाग्यावर घालूं लागले. आपण अर्ज केला जे, तहकीक

करून ठाणें घालावें, म्हणोन जाहिर केलें. नवरोज मजालसीमध्यें बरहक्क इनसाफ न्याय तहकीक पाहतां संपूर्ण मिरासी लोक व शेटिये महाजन यांणीं सत्य स्मरोन सांगितलें जे, रंगो बाबूजी धडफळे यांहीं निजामशाही अंमलांत प्र० मजकूरचा अंमल केला. तीस वर्षें अंमल धडफळे आपले घरीं राहून करीत होते. अंमल निघाल्यावर सिध्धी याकुब याचें ठाणें आलें. ते वेळेस ठाण्याची जागा असती तर ते त्याच जाग्यावर राहते. त्यास ठाण्याची जागा दुसरी आहे. ही जागा यांचीच. याची पूर्वींची महजर आणून पाहणें. मग महजर आणिला. त्यास एकशें चाळीस वर्षें झालीं. जायाची हद्दहदूद पाहतां महजराप्रमाणें आहे. लांबी दक्षिणोत्तर हात १२०, रुंदी पूर्वपश्चिम हात ९१, एकूण दक्षिणेस मशिदीमुळें खळ आहे; पश्चिमेस रस्ता व गजबाजार, शेख इसामुद्दीन; उत्तरेस रस्ता, पूर्वेस रस्ता व कासारांचीं दुकानें. याप्रमाणें तुम्ही तीन डोया या जाग्यावर झाला. जागा वारसी हें तहकीक झालें. देशपांडे याणें कुसूर केला तो बातल झाला. याजउपरी तुमचे तुम्ही लेंकरांचे लेंकरीं जाग्यावर इमारत करून व बाजारचे दुकान करून सुखें नादणें. बेवारीस असें महजर नाहीं."

एका महाराष्ट्र कवीनें म्हटलें आहे कीं—

"जरी सुगर मिळे वाजविणार।
तरीच पावा वाजे सुस्वर"।

तसेंच न्याय हा मूर्तिमंत उभा राहून कधीं कोणाला देतो असें नाहीं. ज्याकडे न्याय देण्याचें काम असतें, त्याचें मन न्यायी असलें पाहिजे. न्यायाधीशामध्यें मुख्यत्वें निष्पक्षपात व निस्पृहता हे गुण अवश्य असले पाहिजेत. ते या निवाड्यांत ढळढळीत दिसून येतात. जेथें सरकार व रयत यांचा साक्षात् संबंध येऊन पोंचतो तेथें रयतेच्या माना मुरगाळून आपल्या यजमानाचें अन्यायानें हित करण्याकडे दिवाण, कारभारी, सुभेदार वगैरे कामगारांचें लक्ष असतें. पण तशी येथें भालेराई दिसून येत नाहीं. धडफळे यांच्या जाग्यांत सरकारचें

ठाणें ( वाडा ) बांधण्याचा पूर्वींचा दादांचा विचार होता, तरी पंचाइतीच्या वेळेस योग्य पुरावा पुढें आल्यावर धडफळे यांच्या वतीनें दादांनीं व इतर पंचांनीं न्याय दिला. 'बळी तो कान पिळी' असा प्रकार झाला नाहीं. ही गोष्ट दादांस अत्यंत भूषणास्पद आहे. या लहानशा गोष्टीपासून तमाम न्याय देणारे कामदार यांनीं बोध घेण्यासारखा आहे. असो.

दादोजी कोंडदेव कैलासवासी झाल्यावर त्यांचें और्ध्वदेहिक कर्म त्यांच्या मुलाच्या हातून शिवाजी महाराजांनीं यथास्थित करविलें. दानधर्म पुष्कळ करविला. आणि त्यांच्या कुटुंबाचा योगक्षेम चांगला चालण्यासारखी त्यांस नेमणूक करून दिली. हा त्यांचा संक्षिप्त जीवनवृत्तांत झाला. आतां स्वदेशभक्तांचें बाहुस्फुरण करणारा विषय आहे, तो पुढच्या भागांत देऊं.

---

## भाग ४.

## महाराजांचा उपजत अंगस्वभाव व त्याजवर कांहीं विचार.

श्रेष्ठ कार्य करी तो श्रेष्ठ ॥ कृत्रिम करी तो कनिष्ठ ॥
कर्मानुसार प्राणी नष्ट ॥ अथवा भले. ॥

'रामदास.'

शिवाजी महाराजांमध्यें स्वतंत्रपणें वागण्याची इच्छा आणि स्वदेशाभिमान हे गुण उपजत होतेच. त्यांस आणखी दादांच्या अंतकालच्या उपदेशाची पुष्टि मिळाली. त्यामुळें तो उपदेश वज्रलेप होऊन बसला. तो मग त्यांस उगीच बसूं देईना. स्वधर्माभिमान आणि स्वदेशाभिमान ह्यांच्या उचालक आवेशानें महाराजांस स्फुरण येऊन यवनराजे आपल्या वैभवाच्या तोऱ्यामध्यें निमग्न असतां त्यांचें निर्दलन करण्यास शूर मावळे लोकांना बरोबर घेऊन व शौर्यश्रीनें प्रोत्साहित होऊन ते त्यांच्याशीं टक्कर मारण्यास सिद्ध झाले. त्यांनीं सैन्याच्या कांहीं टोळ्या

---

१. देशपांडे, धडफळे यांचे वंशज हल्लीं पुण्यांत आहेत व त्यांच्या ताब्यांत अद्यापि ही जागा आहे.

त्यांच्या राज्यांत रवाना केल्या. नवे नवे किल्ले बांधण्याचीं कामें झपाट्यानें चालविलीं. आणि त्यांच्या ताब्यांत असलेले कित्येक किल्ले, आपले मनुष्य खराब न करितां युक्तिप्रयुक्तीनें हस्तगत केले. असा त्यांचा विजातीय पराक्रम पाहून महाराष्ट्रदेशांत जिकडे तिकडे त्यांची वाहवा होत चालली. कसा चमत्कार आहे पहा! विद्या, संपत्ति, शौर्य इत्यादिकांचा कोणीं कोत्या समजुतीचा अभिमान धरिला असतां लोक त्यास ताठा, अहंपणा, गर्व, अशीं निंद्य नांवें देतात, आणि तसला अभिमान दुर्गुणांत गणितात. तोच देशहितासाठीं किंवा धर्मवृद्धीसाठीं स्थूलमानाचा पोक्त अभिमान असला तर त्यास स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान अशीं बडेजावी नांवें देतात, आणि तसा अभिमान धरणाऱ्या पुरुषांचा जयजयकार करितात. अर्थात् लोक ज्या कृत्यास किंवा ज्या गोष्टीस चांगलें म्हणतात तें कृत्य किंवा ती गोष्ट करून कीर्ति संपादन करावी, असा मनुष्याच्या मनाचा स्वाभाविक कल होतो. मग देशांतील कांहीं पुरुष पुढें सरून स्वदेशहितार्थ झटतात आणि आपल्या देशाच्या उन्नतीस्तव ते अनेक प्रकारचे कष्ट सुखानें सोशितात. कितीही संकटें आड आलीं तरी त्यांस न जुमानतां ते स्वदेशाच्या पायीं आपलें सर्वस्व अर्पण करण्यास सिद्ध होतात. देवाला त्यांचा नवस असतो कीं, प्रभो, आमचे हाल होतील, खुशाल होवोत. संकटें येतील, खुशाल येवोत. धननाश होईल, खुशाल होवो. प्राण जातील, खुशाल जावोत. परंतु आमच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत आम्ही ज्या देशांत जन्मलों त्या देशाची आमच्या हातून थोडीबहुत तरी सेवाचाकरी घडो.

अशा रीतीनें स्वसुखास व ऐश्वर्यास लाथ मारून स्वदेशकल्याणार्थ चंदनापरी ज्यांनीं आपले देह झिजविले असे निःसीम स्वदेशभक्त या पृथ्वीच्या पाठीवर इतर देशांतही पुष्कळ होऊन गेल्याचें प्राचीन व अर्वाचीन इतिहासांवरून समजतें. हिंदुस्थानाच्या प्राचीन इतिहासाचें 'अनुष्टुप्' असल्यामुळें प्राचीन कालीं कशी काय स्थिति होती हें कळण्यास मार्ग नाहीं; परंतु चारपां-

चशें वर्षांच्या अलीकडचे जे इतिहास व ज्या बखरी उपलब्ध आहेत त्यांजवरून ह्या महाराष्ट्रदेशांतही वेळोवेळीं राज्यकारस्थानी, स्वधर्माभिमानी, तत्त्वज्ञानी, अध्यात्मवेत्ते, गणिती, स्वदेशभक्त, विद्वान्, शौर्यशाली, इत्यादि अनेकविध पुरुष होऊन गेल्याचें दिसतें. परंतु त्यांत स्वदेशाभिमानी आणि धाराशूर पुरुषांचा भरणा किती होता हें पाहूं लागलों तर राजगुरु दादोजी कोंडदेव, छत्रपति शिवाजीमहाराज, श्री० रामदासस्वामी, श्री० धावडशीकर स्वामी, श्री० पहिले बाजीरावसाहेब पेशवे, मोरोपंत पिंगळे, राणोजीराव शिंदे, मल्हारराव होळकर, सदाशिवराव भाऊ, बळवंतराव मेहेंदळे, बापू गोखले, संताजीराव घोरपडे, दमाजीराव व पिलाजीराव गायकवाड, धनाजीराव जाधव, जयाजी शिंदे, दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे, महादजी शिंदे, नाना फडणवीस इत्यादि कांहीं पुरुषांचीं नांवें दृष्टीस पडतात; परंतु त्यांची संख्या एके दाहीं दाहा, किंवा, बे दाहीं वीस, ह्याच्या पलीकडे जात नाहीं. ह्यावरून, या हिंदुस्थानच्या जमिनींत स्वदेशाभिमानाचें बीं चांगलेंसें रुजत नाहीं म्हणा, रुजत असलें तर त्यास हवापाणी मानत नाहीं म्हणा, किंवा मानत असलें तर त्याचें पीक लोकांस रुचत नाहीं म्हणा; ह्यांपैकीं कोणतें तरी एखादें खरें कारण असलें पाहिजे. अथवा एखाद्या लहानशा जमिनीच्या तुकड्यांत आंबा, कुचला, चिंच, अंजीर, वाघांटी, मिर्चीं, चंदन, सतापा, मोतिया, पाच, मरवा, निर्गुंडी, शिवाय कित्येक धान्यें, गवतें, व वेली यांची एकाशेजारीं एक दाटीनें लागवड करून सर्व प्रकारच्या झाडाझुडपांची खिचडी करावी, मग त्यांत गोड, आंबट, कडू आणि तिखट फळें, सतापाच्या व निर्गुंडीच्या पाल्याची घाण आणि मोतियाचा व मरव्याचा सुगंध हीं सर्व एकत्र होऊन तेथें एकट्या सुगंधाचें तेज पडत नाहीं. तसें हेवा, औदार्य, द्वेष, मत्सर, दया, स्तुती, देशाभिमान ह्यांचें पीक हिंदुस्थानांत एकाच ठिकाणीं पिकून देशाभिमानाचा ग्राह्यांश इतर दुर्गुणांत मुरून जातो, आणि त्याचें एकट्याचें बळ चालेनासें होतें. असा ह्या देशाचा

कांहीं स्वाभाविक गुण असेल तर न कळे. आतां ह्यावरून इतर राष्ट्रांत एथच्याप्रमाणें दुर्गुण मुळींच नाहींत असें आमचें म्हणणें नाहीं. 'गांव तेथें म्हारवाडा' आहेच. परंतु एकंदर देशावर कांहीं अरिष्ट गुदरल्यास त्या समयीं खासगी द्वेष, मत्सर वगैरे दुर्गुण एका बाजूस ठेवून त्या अरिष्टाचें निवारण करण्यास सर्व लोक तेथें एकचित्त होतात. हा त्यांच्यामध्यें विशेष स्तुत्य गुण आहे, व ह्याचेंच नांव खरी स्वदेशप्रीति!

इतिहासाच्या सूक्ष्म अवलोकनावरून असें लक्षांत येतें कीं, कांहीं पुरुषांमध्यें स्वदेशभक्ति हा गुण उपजतच असतो; तो शिकून त्यांस आलेला नसतो. छत्रपति शिवाजी महाराज व श्री० पहिले बाजीरावसाहेब पेशवे ह्यांचा स्वदेशाभिमानाचा अंकुर त्यांच्या गर्भवासांतूनच दिसूं लागला होता. दहा वर्षांच्या वयापासूनच शिवाजीमहाराजांचा स्वदेशप्रीतीचा अंकुर स्पष्ट दिसूं लागला. एका जुन्या मराठी बखरींत असें लिहिलें आहे [१] कीं, त्यांचे वडील शहाजीराजे एकदां विजापूरच्या दरबारांत त्यांना लहानपणीं आपल्याबरोबर घेऊन गेले. तेव्हां चालीप्रमाणें बादशहास खुरनिसाविरनिसा कांहींएक न करितां महाराज बापाचे शेजारीं वीरासन ठोकून बसले. 'पुन्हां असें केलेंस तर कामास पडणार नाहीं. बादशहा आपले धनी, सबब त्यांची आपण अदबी राखिली पाहिजे. नाहीं तर आपल्यावर त्यांचा राग होईल,' असें बाप त्यांस घरीं गेल्यावर रागें भरला. तेव्हां शिवाजीमहाराज म्हणाले:—"ते मुसलमान, आम्ही हिंदु. ते आमच्या गाई मारून खातात, हें केवढें पाप करितात! हिंदुधर्माची आमच्या डोळ्यांदेखत ते अशी विडंबना करितात. ह्यासाठीं मी त्यांस कधीं मुजरा करणार नाहीं. माझे धनी आपण. ते माझे धनी नव्हेत आणि मी त्यांचा चाकर नव्हें. ते कोण, आमचे घरचे ना घाटचे. ते वेगळे, आम्ही वेगळे. आमचा मुलूख आजपावतर वहिवाटून त्यांनीं आमचा अन्वाचा

---

१. हा मजकूर कान्हीकर जहागीरदार ह्यांच्याजवळ असलेल्या एका हस्तलिखित बखरींतून घेतला आहे.

सव्वा पैसा वसूल करून खाल्ला. आतां आमच्या मुलुखाचा कारभार आम्ही बघणार. त्यांनीं आमचा देश सोडून आपल्या देशाला निघून जावें. वहिवाटदाराला मालक कधीं मुजरा करीत नसतो. ते आमचे वहिवाटदार आहेत म्हणून त्यांनींच आम्हांला अगोदर मुजरा केला पाहिजे."

असा शिवाजीमहाराजांचा हूड, तल्लख व मानी स्वभाव पाहून व हें वर्तमान बादशहास कळलें तर तो आपला फडशा पाडील असा विचार करून, शहाजीराजांनीं त्यांना दूर दादोजी कोंडदेवांचे शिक्षेंत पुण्यांत ठेविलें, व मुलगा लहान म्हणून जिजाबाईसाहेबही आपल्या बाळराजाजवळ पुण्यास राहिल्या. अस्तु. आतां महाराजांच्या थोरल्या गुरुजींचें पुढच्या भागांत थोडेंसें दिग्दर्शन करून वाचकांची रजा घेऊं.

---

## भाग ५.

### विषयोपन्यास.

**शिवराजा ज्ञानद जो जैसा तो याज्ञवल्क्य जनकास।**
**तरले भवार्णवीं बहु दृढतर त्याची धरूनि जन कांस ॥**

'मोरोपंत.'

आतां या विषयाची आटपाआटपी करण्यापूर्वीं सदरहू हकीकतीवरून आम्हीं बोध घेण्यासारख्या ज्या कांहीं गोष्टी निष्पन्न होतात त्यांच्या निरूपणादाखल दोन शब्द येथें टिपून ठेविल्याखेरीज आमच्यानें पुढें जाववत नाहीं.

कोणत्याही देशांत चांगले किंवा वाईट लोक निपजणें याला बहुतांशीं गृहशिक्षा ही कारणीभूत आहे. चांगले कायदे, कानू, शिस्त आणि व्यवस्था यांना तीच कारण आहे. देशांत राजे व दिवाण यांच्या हातून या साऱ्या गोष्टी व्हावयाच्या, ते पाडतील त्याच चाली पडावयाच्या, व त्याच चालींनीं गतानुगतिक लोक चालावयाचे. अर्थात् राज्यकारभारांत वागणाऱ्या लोकांस जशी बाल्यावस्थेंत गृहशिक्षा मिळाली असेल त्याप्रमाणें त्यांच्या हातून

बऱ्या किंवा वाईट गोष्टी घडावयाच्या, हें उघड आहे. ह्याकरितां राज्यकारभार करणाऱ्यांपेक्षां मुलांचीं आईबापें व पंतोजी हीं फार हुशार, नीतिमान् व पुढची पोंच असणारीं अशीं असलीं पाहिजेत. मूल कितीही उपजत बुद्धिमान् असलें तरी लहानपणीं तें ज्या लोकांत हिंडतें, फिरतें, खेळतें आणि वागडतें त्यांचे कांहीं तरी गुणावगुण त्याला लागल्याखेरीज रहात नाहींत. बाळ जन्मास येतें तेव्हां तें चांगलें किंवा वाईट यांतून कांहींच नसतें. त्याचा चांगुलपणा किंवा वाईटपणा त्याचें पालनपोषण करणारे किंवा शिक्षण देणारे यांच्या आचारविचारांवर अवलंबून असतो. तें जन्मास येतें त्याच घटकेस त्याच्या शिक्षणास आरंभ होतो. एका बाईचा एक पांच वर्षांचा मुलगा होता. तिनें एका विद्वानाला पुसलें कीं, 'महाराज, याला विद्या शिकविण्याला आरंभ कधीं करावा?' तो म्हणाला 'बाई, एकून तुम्हीं याला शिकवायाला अजून आरंभच केला नाहीं? तर मग हीं त्याचीं पांच वर्षें तुम्हीं फुकट घालविलींत! मुलाचा जन्मकाल हाच त्याच्या शिक्षणाचा आरंभकाल होय बरें.' तात्पर्य, मुलें ज्या गोष्टी नित्य पाहातात व ऐकतात त्यांचें तीं अनुकरण करितात. अनुकरण हेंच त्यांचें प्रथमचें शिक्षण. सद्गुण किंवा दुर्गुण यांचें बीजारोपण प्रथमतः त्यांच्या बाल्यावस्थेंतच होतें. यासाठीं बाल्यावस्था हा सद्गुणाचा पाया घालण्याचा मुख्य काल होय. मूल चांगलें निपजण्यास त्याच्यापुढें चांगला कित्ता असावा लागतो. सगळ्यांच्या अगोदर त्याची आई त्याच्या नजरेस पडावयाची. यासाठीं आई हा त्याचा पहिला बालबोध कित्ता होय. अर्थात् चांगली सत्यनिष्ठ व हुशार आई ही शंभर गुरूंपेक्षांही अधिक मानिली पाहिजे; कारण मूल पहिल्या प्रथम तिचें अनुकरण करणार. यासाठीं आईबापांनीं आरंभीं आपलें वर्तन चोख ठेविलें पाहिजे. मूल अज्ञान असलें तरी, आपलीं आईबापें बोलल्याप्रमाणें चालतात किंवा नाहींत हें त्याच्या अज्ञानदशेंतच त्याला कळूं लागतें. भाडोत्री हरदास—

"पराचीया नारी माऊलीसमान।
मानलीया धन कोण येथें॥

तसेंच—

"सोंवळ्याची स्फीती।
क्रोधें विटाळला चित्तीं॥

इत्यादि तुकारामबोवांचे बोधपर अभंग कथेंत तालसुरावर म्हणून दाखवून श्रोत्यांस उपदेश करितात; परंतु त्यापासून एकाही श्रोत्यास अनुताप होईल तर शपथ. याचें कारण उघडच आहे. सर्वांना ठाऊक असतें कीं, बोवांचें हें सारें पांडित्य विदागी हातांत पडेपर्यंत. पुढें कांहीं नाहीं. मुलांचा असा समज आपल्या आई-बापांविषयीं होणें अगदीं इष्ट नाहीं. घर ही मुलाची पहिली शाळा. आणि आई हा त्याचा पहिला गुरु होय. पुढें मुलाचा दुसऱ्या लोकांशीं सहवास पडत चालला म्हणजे ती त्याची दुसरी शाळा होय. शिवाजीमहाराजांमध्यें मुळचा अंकुर होताच; पण त्यांच्या मातुश्री जिजाबाईसाहेब ह्या मोठ्या धूर्त व सत्यप्रिय होत्या. त्यांनीं त्या कोमळ अंकुराची जोपासना फार जपून व शहाणपणानें केली. पुढें महाराजांना दादांचें शिक्षण सुरू झालें. त्यानें तो अंकुर जोरावत चालला, आणि या गुरुजीबोवांच्या पाठीमागून दोनचार वर्षांनीं दुसरा एक त्यांना महागुरु भेटला; त्याचा उपदेश व सहवास तर त्यांना राज्यसाधनाच्या कामीं अतिशय उपयोगीं पडला. तो महागुरु स्वतः निरिच्छ होता; तरी लोकांनीं प्रपंचसुख भोगून परमार्थ साधावा अशी त्याची इच्छा असे. त्याच्या मस्तकीं जटा, पायीं पादुका, कटीं मेखळा, हातीं कुबडी, आणि अंगावर भगव्या छाट्या असा त्याचा वेष असे. तो ब्रह्मचारीच राहिला होता. त्यानें हिमालयापासून तों थेट रामेश्वरपर्यंत सर्व मुलूख पाहिला होता. तो शहरांत कधीं राहत नसे. अरण्यांत, कृष्णातीरीं, किंवा डोंगराच्या घळींत कोठेंतरी एकांतीं वास करावा. गांवांत झोळी फिरवून उदरनिर्वाह करावा. ईश्वरोपासनेविषयीं लोकांस बोध करावा. धर्मसंस्थापना करावी. प्रजापीडक म्लेंछांच्या

त्रासांतून लोकांस मुक्त करावें, आणि बोधपर व सोपे प्राकृत ग्रंथ लिहून स्वजनांचें हित करावें. असा त्याचा आयुष्यक्रम असे. त्याला त्या वेळचे तुकारामबोवा देहूकर, जयराम स्वामी वडगांवकर, मोरयादेव चिंचवडकर, रंगनाथ स्वामी निगडीकर, इत्यादि साधु होते, त्यांमध्यें पहिला मान असे. ते सर्व त्यांस "समर्थ" असें म्हणत. हा समर्थ पुरुष कोण असावा हें बहुश्रुत वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. हे महाराजगुरु समर्थ रामदासस्वामी होत. हे सातारा प्रांतीं येऊन बरेच दिवस झाले होते, तरी त्यांची व शिवाजीमहाराजांची प्रत्यक्ष भेट झाली नव्हती. तेव्हां स्वामींनींच आपण होऊन त्यांस एक ओंवीबद्ध पत्र लिहिलें तें असें:—

'तुमचे देशीं वास्तव्य केलें। परंतु वर्तमान नाहीं घेतलें॥
ऋणानुबंधें विस्मरण झालें। काय नेणूं॥ १॥
ह्या भूमंडलाचे ठायीं। धर्म रक्षी ऐसा नाहीं॥
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुम्हांकरितां॥ २॥
जयास जिवाचें वाटे भये। त्यानें क्षात्रधर्म करूं नये॥
कांहीं तरी करूनी उपाये। पोट भरावें॥ ३॥
बहुतां दिवसांचें हें बंड। म्लेंछ माजले उदंड॥
ह्यांचें करूनी दुखंड। राज्य करावें॥ ४॥
सर्वत्र मंडळी धर्ममूर्ती। सांगणें काय तुम्हांप्रती॥
धर्मस्थापनेची कीर्ती। सांभाळिली पाहिजे॥ ५॥

अशा आशयाचें हें स्वामींचें पत्र आलेलें पाहून महाराजांच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. श्रीधर कवीनें म्हटलें आहे कीं—

'धन्यधन्य तोचि दिवस॥ स्वामी स्वमुखें गौरवी विशेष॥
त्यापुढें तुच्छ सुधारस॥ स्वर्गभोग सर्वही॥ १॥'

आणखी—

'दानावरोनि कळे उदार॥ रणीं समजे रणशूर॥
लक्षणावरोनि नृपवर॥ जाणती चतुर पारखी॥ १॥'

अस्तु. दादोजी कोंडदेव व समर्थ रामदासस्वामी हे दोन पुरुष

शिवाजीमहाराजांस राज्यप्रकरणाच्या कामीं किती उपयोगीं पडले हें पुढील धौममहाबळेश्वरवर्णनांतील उताऱ्यावरून स्पष्ट ध्यानांत येईल.

"शिवाजीमहाराजांमध्यें स्वातंत्र्येच्छा व स्वदेशाभिमान हे गुण मोठे होते. ह्यांत शंकाच नाहीं; परंतु त्या गुणांप्रमाणें त्यांच्या हातून कृति होण्यास दोन पुरुष मुख्य कारण झाले. एक दादोजी कोंडदेव व दुसरे रामदास स्वामी. हे उभयतां सज्जन व ब्राह्मण असत. ह्यामुळें राज्यप्रकरणाचे कामांत त्या उभयतांच्या उपदेशानें महाराजांस इतकें उत्तेजन व स्फुरण येई कीं, तेणेंकरून महान् महान् संकटांस न भितां व कधीं निराश न होतां आपले सर्व प्रयत्न त्यांनीं सिद्धीस न्यावे. दादोजी कोंडदेव हा महाराजांचा लहानपणचा गुरु होय. त्यानें मरतेसमयीं महाराजांस काय सांगितलें हें सर्वांस माहीत आहेच. त्याचे पाठीमागें महाराज कैलासवासी होत तोंपर्यंत राज्यसाधनाचे कामांत त्यांस पूर्ण उपदेश रामदासस्वामींचा असे. स्वामी हे केवळ टाळकुटे साधु किंवा ऐहिक स्वार्थास निंद्य समजणारे नसत. 'जनीं वंद्य तें सर्व भावें करावें' असें त्यांनीं मनाचे श्लोकांत मुळारंभींच म्हटलें आहे, व तदनुसार त्यांचें सांगणें शिवाजीमहाराजांस असे."

ह्यावरून त्या समयीं रामदासस्वामी हा एक अद्वितीय पुरुष होऊन गेला असें कोण म्हणणार नाहीं? पुढें स्वामी व शिवाजीमहाराज ह्यांची प्रत्यक्ष भेट, स्वामींचा महाराजांस राजकारणांत उपदेश, स्वामींची स्वदेशप्रीती, स्वामींची स्वधर्मश्रद्धा, स्वामींचा सुस्वभाव, स्वामींची रसाळ वाणी, स्वामींची योग्यता, व ह्या गुरुशिष्यांचीं मनोरंजक व बोधपर भाषणें, हे सर्व प्रकार मोठे मौजेचे व स्वदेशभक्तांनीं लक्षांत धरण्यासारखे आहेत. आतां हा प्रस्तुतचा ग्रंथ वाचकांस गोड लागला तर 'श्री० रामदास स्वामी आणि छत्रपति शिवाजीमहाराज,' हाही विषय एकवार हातीं घेऊन महाराष्ट्रभाषेची पुनः यथामति सेवा करावी अशी दृढतर इच्छा आहे; पण ती सफल करणें विश्वंभराकडे आहे. कारण कीं–

**बोल बोलतां वाटे सोपें । करणी करितां टीरी कांपे ॥**

'तुकाराम.'

असो. आतां सरतेशेवटीं जो या सृष्टिचक्राचें नियमन करितो, जो अनेकविध पदार्थ व अनेकविध प्राणी यांच्यामध्यें नित्य विद्यमान आहे, जो सर्व जगतास आधारभूत आहे, जो संपूर्ण सृष्टीच्या जीवनतत्त्वाचें आदिकारण आहे, आणि जो यदृच्छेनें वरच्यासारख्या सद्विभूति कधीं कधीं ह्या पृथ्वीतलावर उत्पन्न करितो, त्या नित्य, शुद्ध, बुद्ध, परिपूर्ण आणि सच्चिदानंदस्वरूप परमेश्वरास आपण नमन करूं. त्याच्या या अफाट सृष्टीच्या विचाराकडे मन गुंतलें म्हणजे तें भक्तिरसानें दाटून जातें. त्याच्या या अवाढव्य पसाऱ्यापुढें, हजारों कोस पसरलेल्या वाळूच्या पटांगणांतील राळयाएवढा रेतीचा बारीक कण, महासिंधूंतील अतिसूक्ष्म बिंदु किंवा हजारों खंडी गल्ल्यांतील एक धान्यकण, यांच्याप्रमाणें हा यःकश्चित् पराधीन मानवी प्राणी अगदीं क्षुद्र दिसतो. परंतु त्याला त्यानें ज्ञान ही एक अप्रतिम चीज दिली आहे; तिच्या प्रकाशानें त्या अनंतशक्ति परमेश्वराचें अगाध चातुर्य, अतुल कृपा, अपार सामर्थ्य आणि अनुपम कौशल्य हीं त्यास व्यक्त होऊन चित्त विस्मयानें चकित होतें. बुद्धि कुंठित होऊन स्तब्ध होते, आणि मन विस्मयानंदरसांत निमग्न होतें.

**समाप्त.**

9890

# विक्रीचीं पुस्तकें.

| प्राकृत. | किं. रु. | ट. हां. |
|---|---|---|
| कहाण्या—भाग २ रा.... ... ... ... | ०।- | ०॥ |
| ग्लाडस्टन ह्यांचें चरित्र ... ... ... | ०॥। | ०= |
| महाराष्ट्रकंठभूषण, म्हणजे दासबोधांतील स्वजनकल्याणार्थ समर्थांचा बोध... | ०।= | ०- |
| सुनिश्चयप्रभावनाटक. ... ... ... | ०॥ | ०-॥ |
| मधुमक्षिका, अथवा अनेक उपयुक्त व मनोरंजक विषयांचा संग्रह. ... ... ... ... | ०॥ | ०- |
| मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार. | ०।- | ०॥ |
| संगीत शालिनी नाटक ... ... ... | ०॥= | ०- |
| हिंदुस्थानांतील दुष्काळ. ह्या पुस्तकाचे सात विभाग केले आहेत. ... ... ... | ०॥= | ०-॥ |
| मराठ्यांचें आरमार ... ... ... ... | ०।- | ०- |
| सासरे आणि जांवई ... ... ... ... | ०-॥ | ०॥ |
| प्रपंचरहस्य ... ... ... ... ... | १ | ०= |
| साहित्यशास्त्र.... ... ... ... ... | ०॥= | ०-॥ |
| विलक्षण गोष्टी अथवा आत्महत्येचा निवाडा. | १ | ०-॥ |
| नीतिमंदिर ... ... ... ... ... | ०॥= | ०- |
| वसईचा मोहरा ... ... ... ... | ०=॥ | ०॥ |
| इब्राहाम लिंकन यांचें चरित्र ... ... | ०॥ | ०- |
| छत्रपति संभाजीमहाराज ... ... ... | १। | ०= |
| सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार आणि त्या वेळचे पहिले इंग्रज रेसिडेंट सर चार्लस मालेट ... ... ... ... ... | ०॥ | ०- |

| | कि. रु. | ट. हां. |
|---|---|---|
| निवडक पदें व अभंग ... ... ... | ०-॥ | ०॥ |
| पथ्यापथ्यविचार ... ... ... ... | ०-॥ | ०॥ |
| भरतपूरचा वेढा ... ... ... ... | ०।- | ०- |
| मराठ्यांची बखर ... ... ... ... | १॥। | ०≡ |
| मराठ्यांच्या संबंधानें चार उद्गार ... | १। | ०=॥ |
| मुलांस उत्तम बक्षीस... ... ... ... | ०।- | ०- |
| मुलांचें कल्याण ... ... ... ... | ०-॥ | ०॥ |
| विद्यार्थ्यांचा व्याकरणमित्र ... ... ... | ०-॥ | ०॥ |
| वेरूळचीं लेणीं ... ... ... ... ... | ०॥= | ०-॥ |
| श्रीएकनाथचरित्र ... ... ... ... | ०॥।० | ०-॥ |
| श्रीज्ञानेश्वरचरित्र ... ... ... ... | ०॥।० | ०-॥ |
| सज्जन तो सज्जन ... ... ... ... | ०।० | ०- |
| सवाई माधवराव पेशवे ... ... ... | ०≡ | ०- |
| सहा सुलभ संवाद ... ... ... ... | ०- | ०॥ |
| सद्वर्तन ... ... ... ... ... ... | ०॥।० | ०-॥ |
| सांप्रतच्या लेखकांचें कर्तव्य ... ... | ०।० | ०- |
| सुलभ वैद्यक ... ... ... ... ... | ०॥= | ०- |
| सुगमपदार्थविज्ञान ... ... ... ... | ०॥= | ०- |
| लहान मुलाचें शिक्षण ... ... ... | ०= | ०॥ |
| वक्तृत्वकलाविवेचन ... ... ... | ०।= | - |
| विलक्षण गोष्टी अथवा आत्महत्येचा निवाडा | १ | ०-॥ |
| वनराजाचें चरित्र ... ... ... ... | ०।० | ०॥ |
| वैद्यामृतदर्पण ... ... ... ... ... | ०॥= | ०- |

हीं पुस्तकें मुंबईंत निर्णयसागर छापखान्यांत विकत मिळतील.

REFBK-0001410